उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

RNI No. 6153/57

# समाचार
# SAMACHAR

महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी
दर रविवार - दालवाटी, चुरमा
* थाळीमध्ये दररोज आमरस *
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
कापड बाजार, कोहिनूर शेजारी, अ. नगर
(आमरस - ४००/- रु. किलो मिळेल)

Volume - 72 | Issue- 246 | Marathi Daily | Monday 10/6/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: नव्या सरकारपुढील महत्वाचे मुद्दे पान २



केडगाव, मराठानगर येथे ड्रेनेज कामाचा शुभारंभ पान ५



राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत नगरच्या खेळाडूंचे यश पान ६

### उठाठेव

– विवेक मेहेत्रे




निकालाबाबतचा त्यांचा अंदाज साफ चुकला... त्यामुळे मारच पडेल या भीतीने ते अज्ञातस्थळी पळून गेले आहेत!!

## महाराष्ट्रातून गडकरी, गोयल, खडसे, जाधव, मोहोळ
# नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान



**नवी दिल्ली, दि. १०–** नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली येथील राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात झालेल्या शानदार सोहळ्यात तिसऱ्यांदा भारताच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. तिसऱ्यांदा शपथ घेत मोदींनी हॅटट्रीक साधत माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. मोदींच्या शपथविधी सोहळ्याला अनेक देशांच्या प्रमुखांनी उपस्थिती लावली . शिवाय, एनडीएतील घटक पक्षांसह देशभरातील खासदार आणि बॉलिवडू सेलिब्रिटींनी पंतप्रधान मोदींना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी पंतप्रधान मोदींनी पद आणि गोपिनियतेची शपथ घेतली.पंतप्रधान नरेंद मोदी यांच्यानंतर राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

**एकूण मंत्रीपदं** – ७१
**पंतप्रधानपद** – नरेंद्र मोदी, भाजपा
**कॅबिनेट मंत्री** – ३० (भाजपा–२५, जदयू–१, जेडीएस–१, लोजप–१, एचएएम–१ टीडीपी)
**स्वतंत्र पदभार** – ५ (भाजपा–३, शिवसेना–१, रालोद–१)
**राज्यमंत्री** – ३६ (भाजपा–३२, रिपाइं–१, जदयू–२, टीडीपी–१)

महाराष्टातून नितीन गडकरी, मुरलीधर मोहोळ, पीयूष गोयल, रक्षा खडसे, प्रतापराव जाधव, रामदास आठवले यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला असून मंत्रिमंडळ विस्तारात जातीय आणि प्रांतीय समतोल राखण्याचा प्रयत्न केला गेला आहे. काल महाराष्टातून राष्ट्वादी अजित पवार पक्षातर्फे कोणाचाही शपथविधी झाला नाही. (पान ३ वर)

पदभार स्वीकारताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतला. पीएम किसान योजनेच्या १७ व्या हफ्त्याच्या फाईलवर नरेंद्र मोदी यांनी स्वाक्षरी केली. त्यामुळे ९.३ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २० हजार कोटी रुपये जमा होणार आहेत. केंद्रात एनडीए सरकार स्थापन झाल्यानंतर सरकारचा शेतकऱ्यांसाठी हा निर्णय पहिला घेतला आहे.



(छाया– मंदार साबळे)

# मान्सून पूर्व पावसाचा नगरकरांना दिलासा

**समाचार/नगर-दि.१०**

प्रचंड उकाड्याने हैराण झालेल्या नगरकरांना प्री मान्सूनच्या पावसाने दिलासा दिला. यंदा तीव्र उन्हाचा चटका सर्वत्र भासला. नगरमध्ये यंदा तापमानाने उचांकी नोंद केली. अनेक वेळा तापमानाचा पारा ४० अंशाच्या वरती पाहायला मिळाला. सलग अडीच महिन्यात उकाड्याने हैराण झालेल्या नगरकरांना पावसाची आतुरतेने प्रतीक्षा होती. ३१ मे रोजी भारतात आगमन झालेल्या मान्सूनचे सात जून रोजी महाराष्ट्रात कोकणात आगमन झाले. गेल्या तीन दिवसापासून नगरमध्ये प्री मॉन्सून ने हजेरी लावली असून त्यामुळे वातावरणातील तापमानात मोठा बदल होऊन गारवा काही प्रमाणात निर्माण झाला आहे. शुक्रवारी सकाळी पावसाने नगर मध्ये हजेरी लावली. शनिवारी रात्री देखील पावसाच्या सरी बरसल्या. काल रविवारी संध्याकाळपासून सुरू झालेल्या (पान ३ वर)

### निवडक
## केरळच्या खासदाराची मंत्रीपद सोडण्याची तयारी

**नवी दिल्ली, दि. १०–** काल केंद्रीय मंत्रीपदाची शपथ घेतलेले केरळमधील भाजपाचे पहिले आणि एकमेव खासदार सुरेश गोपी यांचादेखील समावेश आहे. गोपी यांनी केंद्रीय राज्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र आता ते मंत्रिपद सोडण्याची शक्यता आहे. शपथविधी समारंभानंतर सुरेश गोपी यांनी नवी दिल्लीत एका मल्याळम वृत्तवाहिनीशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले की, त्यांनी मोदींकडे किंवा पक्षाकडे मंत्रीपद मागितले नव्हते. त्यामुळे त्यांना असे वाटते की एनडीए लवकरच त्यांना पदमुक्त करतील. यावेळी सुरेश गोपी यांना मंत्रीपद सोडण्याचे कारण विचारल्यावर त्यांनी सांगितले की, त्यांनी काही चित्रपट साईन केले आहेत आणि त्यांना ते पूर्ण करायचे आहेत. मतदारसंघात त्रिशूरचा खासदार म्हणून ते काम करत राहणार आहेत. सुरेश गोपी हे त्रिशूर लोकसभेतून खासदार म्हणून निवडून आले आहेत. ते केरळमधील भाजपाचे पहिले खासदार आहेत. त्रिशूरमध्ये त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार व्ही. एस. सुनीलकुमार यांचा ७४,६८६ मतांनी पराभव केला आहे.

## नाना पटोलेंकडून काँग्रेस कार्यकर्त्यांना उभारी
# बालेकिल्ल्याचे गतवैभव नगरला पुन्हा मिळवा



**समाचार/नगर-दि१०**

एकेकाळी नगर जिल्हा हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळख होती. नगर दक्षिणेत महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके आणि उत्तरेत भाऊसाहेब वाघचौरे यांच्या विजयाने प्रस्थापित पक्षांना सुरुंग लागला. आता जोमाने कामाला लागा आगामी विधानसभा निवडणुकीत नगर जिल्हा काँग्रेस बालेकिल्ला हे गतवैभव काँग्रेस पक्षाला परत मिळवून द्या, असे सांगत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नगर जिल्हा काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदन स्वीकारताना त्यांना उभारी दिली.

मागील काळात महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष नो व्हेयर झालेला असताना राज्यात पुन्हा एकदा काँग्रेसला गतवैभव प्राप्त करून देणारे (पान ३ वर)

# भाजपाचा नगरमध्ये आनंदोत्सव

**समाचार/नगर-दि१०**

भारतीय जनता पार्टी नगर महानगरायावतीने मोदी ३.० शपथविधी दिमाखदार सोहळा नगर भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते पदाधिकारी यांनी पावसात चिंब भिजत मनमुराद आनंद घेतला. हा सोहळा पाहण्यासाठी नागरिकांची उपस्थिती होती. याप्रसंगी एकमेकांना पेढे भरून मोदींच्या नेतृत्वाखालील मंत्री मंडळाला शुभेच्छा दिल्या.

आगामी काळात जनतेसाठी व काँग्रेस व राष्ट्रवादी पवार गट यांनी लोकसभा निवडणुकीत जो नॅरेटिव्ह सेट केला होता. त्यासाठी कार्यकर्ते पदाधिकारी यांनी जनतेत जाऊन या संदर्भात संभ्रम दूर करणे गरजेचे आहे असे जिल्हाअध्यक्ष ॲड. अभय जगन्नाथ आगरकर यांनी आपल्या भावना बोलताना व्यक्त केल्या. हा सोहळा पाहण्यासाठी ॲड. अभय आगरकर, वसंत लोढ़ा, सचिन पारखी, गोपाल वर्मा, साहिल शेख, बाबासाहेब सानप, किशोर वाकळे, संतोष गांधी, चेतन जग्गी, पंडित वाघमारे, अनंत देसाई, अशोक गायकवाड, प्रवीण ढोणे, करण डापसे, पप्पू गर्जे, बाळासाहेब भुजबळ, राहुल जामगावकर, नितिन शेलार, लक्ष्मीकांत तिवारी, अनिल निकम, विक्रम शिंदे, राजू वाडेकर, ओमकार लेंडकर, डॉ. करमाळकर, लालबागे, राज शेलारे, पडोळे, सचिन पळशीकर, रोहित पाथरे,धिरडेकाका, अभिषेक वाकळे, अनिल निकम, सुजय मोहिते, प्रथमेश देशमुख, दीपक देहेरेकर, रासने, सुहास पाथरकर, सागर शिंदे उपस्थित होते.





समाधानकारक पावसामुळे पेरणीपूर्व मशागतीसाठी शेतकऱ्यांची लगबग

## रविवारी ७६ मिलिमीटर पावसाची नोंद
# पारनेरमध्ये खरीप हंगामाच्या आशा पल्लवीत

**समाचार/पारनेर-दि.१०**

रविवारी (दि.९) संध्याकाळी सहा ते सात वाजेच्या दरम्यान पारनेर तालुक्यात सर्वदूर पूर्वमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली.

पारनेर शहरातील पर्जन्यमापकावर रविवारी ७६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. गेल्या तीन वर्षांत प्रथमच खरीप हंगामाच्या सुरूवातीला झालेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागतीची कामे उरकली आहेत. वाफसा झाल्यानंतर पेरणीच्या कामाला वेग येईल. मात्र खते व बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे.

गेल्या पंधरा दिवसात तालुक्यातील तुरळक ठिकाणी, कमी अधिक प्रमाणात पाऊस झाला होता. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांची पेरणीची कामे आटोपली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने वाटाणा पिकाच्या पेरणीचा समावेश आहे. उगवून आलेल्या वाटाण्याच्या रोपांसाठी काल झालेला पाऊस उपयुक्त आहे.

रविवारी झालेल्या पावसामुळे नालाबांध, सलग समतल चरांमध्ये पाणी साठण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. फळबागांसाठी पाऊस उपयुक्त आहे.जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. हिरवा चाराही लवकरच उपलब्ध होणार असल्याने पशुपालक,दूध उत्पादकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. (पान ३ वर)



काटवन खंडोबा रस्त्याची आ. संग्राम जगताप यांनी स्थानिक नागरिकांसमवेत पहाणी करत रस्ते दुरूस्तीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. समवेत माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा.संभाजी पवार, विजय गव्हाळे, अनुप काळे, शहर अभियंता मनोज पारखे, इंजि.श्रीकांत निंबाळकर, यांच्यासह नगर रचना विभागाचे अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

## जसप्रीत बुमराह सामनावीर
# रोमांचक सामन्यात भारताचा पाकिस्तानवर विजय

**समाचार/नगर-दि.१०**

आयसीसी पुरुष टी २० विश्वचषक स्पर्धेत काल अ गटातील भारत विरुद्ध पाकिस्तान झालेल्या रोमहर्षक सामन्यात भारताने पाकिस्तानचा सहा धावांनी पराभव केला. शेवटच्या चेंडू पर्यंत चाललेला या सामन्यात आपल्या पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर विजय मिळवून विश्वचषक स्पर्धेतील पाकिस्तानवर विजयाची परंपरा भारताने कायम राखली.

काल अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे टी ट्वेंटी विश्वचषकात चार अ गटातील भारताचा दुसरा सामना पाकिस्तान विरुद्ध खेळला गेला. या सामन्यावर सुरुवातीपासूनच पावसाचे सावट होते त्यामुळे काहीशा विलंबाने सामना सुरू झाला. नाणेफेक पाकिस्तानने जिंकत प्रथम फलंदाजी करताना भारताचा डाव १८.६ षटकात केवळ ११९ धावांमध्ये संपुष्टात आला. काल भारतीय फलंदाजी पाकिस्तानच्या मारासमोर विशेष कामगिरी करू शकले नाही. दोन बाद ६४ वरून सर्व बाद ११९ धावांमध्ये भारताचा डाव संपला. भारतातर्फे सर्वात जास्त ४२ धावा ( ३१ चेंडू) ऋषभ पंत याने केल्या. त्याला अक्षर पटेलने २० तर रोहित शर्माने १३ यांनी साथ दिली. भारताकडून




काल इतर फलंदाज विशेष कामगिरी करू शकले नाही. इतकेच नाहीतर पूर्ण २० षटक देखील भारतीय फलंदाजांना खेळता आले नाहीत. त्यामुळे भारतीय क्रिकेट रसिकांची काही वेळ निराशा झाली होती. २० षटकात १२० धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीला उतरलेल्या पाकिस्तान संघाची सुरुवात चांगली झाली. पाकिस्तानचा पहिला बळी २६ धावांवर दुसरा ५७ तर तिसरा ७३ धावांवर गेला. तोपर्यंत पाकिस्तानची परिस्थिती चांगली होती. परंतु त्यानंतर एका मागोमाग पाकिस्तानचे गडी बाद होत गेले. काल जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद शमीच्या अचूक माऱ्यापुढे पाकिस्तानचा निभाव लागला नाही. पाकिस्तानचे गडी जरी कमी बाद झाले असले तरीही जसप्रीत बुमराहच्या भेदक माऱ्यामुळे पाकिस्तानला धावा काढणे जिकरीचे झाले त्यामुळे धावांची आवश्यक सरासरी वाढत गेली व पुढे त्यांचे गडी बाद होत गेले. पाकिस्तानचा संघ १५ षटकानंतर एकही चौकार षटकार लगावू शकला नाही. पाकिस्तानकडून सर्वात जास्त ३१ धावा सलामीवीर मोहम्मद रिजवान ने केल्या. बाबर आझम, उस्मान खान, फखर जमान हे तिन्ही फलंदाज प्रत्येकी १३ धावा करत बाद झाले. तर इमाद वसीम १५ धावा करून बाद झाला. भारताकडून जसप्रीत बुमराह आणि (पान ३ वर)

**जसप्रीत बुमराह सामनावीर**

काल जसप्रीत बुमराहने अत्यंत अचूक आणि भेदक गोलंदाजी केली. त्याने चार षटकांमध्ये १४ धावा देत तीन बळी घेतले. त्याच्या चार षटकांमधील १५ चेंडू निर्धाव होते जे पाकिस्तानच्या पराभवाला मुख्य कारणीभूत ठरले. जसप्रीत बुमराहची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली.

विकणे आहे
आऊट डोअर, इनडोअर, टाईप ११ के.व्ही, ३६० ए एम पी एस, २० के, लोड ब्रेक स्वीच पॅनल विकणे आहे, तरी इच्छुक खरेदीदाराने त्यांचे दरपत्रक दिनांक १७/०६/२०२४ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावेत. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
-: विश्वस्त मंडळ :-
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट
वेदांतनगर, मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर -४१४००३
इमेल : shridattakshetra@gmail.com

JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

संपादकीय

# नव्या सरकारपुढील महत्वाचे मुद्दे

निवडणूक निकालांची रणधुमाळी आता ओसरली असून अनेक दखलपात्र बाबी समोर येत आहेत. त्यात काही मुद्दे नोंद घेण्याजोगे आहेत. २०१९ मधील निकालांच्या तुलनेत भाजपाने ६३ जागा गमावल्या हे नाकारुन चालणार नाही. त्यातील मोठा फटका उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील निकालांमुळे बसला, हेदेखील वास्तव आहे. मात्र त्याचबरोबर भाजपने ओरिसा, केरळ आणि आंध्र प्रदेशमध्ये जागांची चांगली कमाई केल्याचे दुर्लक्षित करुन चालणार नाही. ओरिसामध्ये तर प्रथमच त्यांचे स्वत:चे सरकार स्थापन झाले आहे. गेली २५ वर्षे तिथे बिजू जनता दलाचे सरकार होते. मात्र त्यांचा दारुण पराभव झाला. बीजेडीला लोकसभेची केवळ एकच जागा मिळाली तर अन्य सगळ्या जागा भाजपाला मिळाल्या. काँग्रेसला तिथे तसेच आंध्र प्रदेशमध्ये काहीही स्थान राहिले नाही. खेरीज वायएसआरसीपी या काँग्रेसच्याच भावंडाला आंध्र विधानसभेमध्ये अत्यंत कमी म्हणजे १७५ पैकी अकरा जागा मिळाल्या आहेत. म्हणजेच आंध्र प्रदेश आणि ओरिसाने भाजपाला चांगला हात दिला आहे. केरळमध्ये भाजपाचे उमेदवार दोन–तीन ठिकाणी कडवी टक्कर देत होते. मात्र त्यातील एका ठिकाणी विजयश्री त्यांच्या गळ्यात पडली. तामिळनाडूमध्ये सुरूवातीला तीन ठिकाणी ते आघाडीवर दिसत होते. तिथे त्यांची मतेही वाढली, मात्र एकही जागा मिळाली नाही. मागील निवडणुकीतील १८ जागांच्या तुलनेत यावेळी पश्चिम बंगालमध्ये भाजपाला कमी जागा मिळाल्या. मात्र हा सेटबॅक असला तरी देशाच्या चारही कोपऱ्यामध्ये भाजपा पोहोचला असल्याचे ताज्या निकालांनी दाखवून दिले आहे. मागील दोन्ही टर्ममध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीनेच देशाचा कारभार सांभाळला. आताही रालोआचेच सरकार स्थापन होणार आहे. फक्त यावेळी बदलत्या परिस्थितीचा परिणाम म्हणून नरेंद्र मोदी यांना आपल्या भाषेत थोडा बदल करावा लागेल. आता 'मोदी की गॅरेंटी' न म्हणता 'एनडीए की गॅरेंटी' असे म्हणावे लागेल. त्याचप्रमाणे मोठे निर्णय घ्यायचे झाल्यास मित्रपक्षांना विचारात घ्यावे लागेल. निकालानंतर लगेचच त्यांनी आपल्या तिसऱ्या टर्ममध्ये अधिक धमाकेदार निर्णय घेण्याचे सूतोवाच केले. अर्थातच त्यात आर्थिक सुधारणांचे अनेक मुद्दे अंतर्भूत असणार आहेत. खेरीज गेल्या दोन टर्ममध्ये न सोडवलेले अनेक प्रश्न सोडवण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे. यातील एक म्हणजे जीएसटीचा दर कमी करण्याचा विषय महत्वाचा असेल. आपल्याकडे काही उत्पादनांवर १८ टक्के तर काहींवर पाच किंवा बारा टक्के आणि काहींवर २८ टक्के जीएसटी आहे. मात्र दोन वा तीन श्रेणींमध्ये हा कर आकारला जावा, ही मुळात या कायद्याची धारणा होती. अरुण जेटली यांनी कायदा मांडताना हाच विचार समोर ठेवला होता. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये त्यांना हा बदल घडवून आणता आला नाही. त्यामुळेच आगामी कार्यकाळात मोदी या विषयाला हात घालण्याची शक्यता आहे. याचबरोबर पेट्रोलियम पदार्थ आणि दारुवरील कर जीएसटीमध्ये अंतर्भूत करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आधीच्या कार्यकाळातही आखला गेला होता. मात्र ते होऊ शकले नाही. याचे कारण म्हणजे या दोन करांद्वारे राज्य सरकारांना मिळणाऱ्या महसुलाचे प्रमाण खूप जास्त आहे. त्यामुळे राज्य सरकारांचा याला विरोध आहे. परंतु, या कार्यकाळात मोदी हा बदल घडवून आणू शकले तर या व्यवहारांना मोठ्या प्रमाणात चालना मिळेल आणि अर्थकारणालाही बळ मिळेल. 'एक देश एक निवडणूक' हादेखील मोदींपुढील एक महत्त्वाचा अजेंडा आहे. मात्र नवीन कार्यकाळात हे कितपत शक्य होईल, याबद्दल शंका वाटते, कारण यासाठी त्यांना घटनादुरुस्ती करावी लागेल. अर्थातच त्यासाठी त्यांना दोन तृतियांश बहुमताची गरज भासेल. मात्र आता त्यांच्याकडे ही ताकद नाही. म्हणून अन्य पक्ष यासाठी मदत करतात का, हे आधी बघावे लागेल. याबाबतच नव्हे तर पक्षाची भविष्यकाळातील धोरणे ठरवतानाही मित्रपक्षांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. त्यानंतर त्यानुसारच राजकारणाची नीती आखावी लागेल. या सगळ्यात चंद्राबाबू नायडू आणि नीतिशकुमार महत्त्वपूर्ण भूमिकेत असतील. मात्र त्यांना केंद्रात मंत्रीपद भूषवता येणार नाही, कारण ते आपापल्या राज्यात मुख्यमंत्रीपद सांभाळत आहेत. त्यामुळे त्यांना निवडून आलेल्या खासदारांना महत्त्वाची खाती द्यावी लागतील. त्याचप्रमाणे बिहार आणि आंध्र प्रदेशला विशेष राज्याचा दर्जा देण्याचाही विचार त्यांना प्राधान्याने करावा लागेल. याचे कारण म्हणजे या दोन्ही राज्यांनी वारंवार ही मागणी केली आहे. मोदी सरकारने आत्तापर्यंत तिकडे फारसे लक्ष दिले नाही. मात्र आता त्यांना असे दुर्लक्ष करता येणार नाही. या दोन्ही राज्यांना विशेष दर्जा देत केंद्राकडून अधिक पैसे कसे मिळतील, अधिक वाटा कसा मिळेल हे त्यांना पहावे लागेल. येथे लक्षात घेण्याजोगी आणखी एक महत्वाची बाब म्हणजे गेल्या निवडणुकीच्या तुलनेत भाजपची मते खूप कमी झालेली नाहीत. मात्र जागा कमी झाल्या आहेत. किंबहुना, गेल्या निवडणुकीत मिळालेल्या मतांपेक्षा त्यांना ७० लाख अधिक लोकांनी मते दिली आहेत. टक्केवारीनुसार मात्र पाऊण टक्क्यांची घट झाली आहे. याचे कारण गेल्या पाच वर्षांमध्ये वाढलेल्या मतदारांच्या संख्येत आहे. मागच्या निवडणुकीत ९० कोटी मतदार होते. आता सुमारे ९७ कोटी मतदार होते. त्यापैकी ७० टक्क्यांच्या आसपास लोकांनी मतदान केले. या आकडेवारीमधील एकट्या भाजपाला मिळालेली वाढीव मते बघितली तर मोदींची लोकप्रियता कमी न झाली नसल्याचे चित्र दिसते. म्हणूनच भाजपाच्या कार्यकर्त्यांनी वा पाठीराख्यांनी निराश होण्याचे कारण नाही. ही स्थिती असल्यामुळेच देशात वा आंतरराष्ट्रीय पातळीवर मोदींच्या प्रतिमेवर वा देशाच्या भक्कम स्थितीवर कोणताही दुष्परिणाम होण्याची शक्यता नाही.

# 'अरुणोदय'मध्ये उद्यापासून मोफत शस्त्रक्रिया शिबीर

**समाचार/नगर-दि.१०**

आ.संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ११ जून ते १४ जून पर्यंत अरुणोदय सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने गरजू रुग्णांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले असल्याची माहिती डॉ.शशिकांत फाटके व वंदना फाटके यांनी दिली.



डॉ. फाटके म्हणले की, गरजू रुग्ण आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे आजारपण अंगावर काढत असतात तसेच शस्त्रक्रिया करून घेत नाहीत यासाठी गरजूवंत रुग्णांना आधार देण्यासाठी अरुणोदय सुपर फॅसिलिटी हॉस्पिटलच्या वतीने खुबा बदली, गुडघे बदली, कॅन्सर शस्त्रक्रिया, अपघाताच्या रुग्णावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच दाता संबंधित सर्व प्रकारच्या मुख कर्करोग, हिरड्यांचे आजार, दंत व्यंग, लहान मुलांचे दाताचे आजार, कृत्रिम दत्तरोपण, तोंडाचे अल्सर,लहान मुलांचे व वृद्धांचे हलणारे दात काढणे प्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे. नेत्र तपासणी डोळ्यांची शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. तरी जिल्हाभरातील रुग्णांनी मोठ्या संख्येने मोफतशस्त्रक्रिया शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# नगरमध्ये उद्यापासून मोफत योग वर्ग

**समाचार/नगर-दि.१०**

जागतिक योगदिना निमित्त योग (दि. २१) विद्या धाम तर्फे ११ ते २१ जून दरम्यान प्रोटोकॉलचे योग वर्ग शहरांत ठिकठिकाणी सकाळी / सायंकाळी सर्वांसाठी मोफत घेतले जाणार आहेत.




सावेडी भागात भिस्त बाग रोडला योग भवन येथे व सिद्धीबाग येथील व्यायाम शाळेच्या वर सकाळी / सायंकाळी तसेच नवले हॉल गुलमोहर रोड येथे सकाळी हे वर्ग राहतील . सर्व योग प्रेमी नगरकरांनी या मोफत वर्गांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच परिसरात कोणीही हॉल आणि विद्यार्थी (साधक) उपलब्ध करून दिल्यास तेथे योग विद्या धाम संस्थेचे तज्ञ योग शिक्षक मोफत प्रोटोकॉलचे योगवर्ग घेतील. या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन संस्थेचे कार्याध्यक्ष सुभाष पांढरे यांनी केले.



डॉ. प्रकाश माधव शेठ यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त

# अनामप्रेमच्यावतीने अमृत महोत्सव व अभीष्टचिंतन सोहळा संपन्न

**समाचार/नगर-दि.१०**


डॉ. प्रकाश माधव शेठ हे मातृहृदयी, अजातशत्रू असे व्यक्तिमत्व आहे. त्यांचा जरी ७५ वा वाढदिवस असला तरी ते मनाने व कामाने खरोखरच २५ वर्षाचे असल्यासारखे आहेत. डॉ. प्रकाश माधव शेठ्यांची सर्वात महत्वाची इन्व्हेसमेंट म्हणजे त्यांचा असलेला प्रचंड मित्रपरीवार. आपण जन्माला आल्यानंतर काही आणत नाही, मरतानाही काही घेऊ जात नाही यांची जाणीव सर्वानाच नसते. डॉ. प्रकाश माधव शेठ यांना मिळालेला प्रत्येक क्षण दुसऱ्याला कसे सुखी करता येईल यातच खर्च करतात त्यांची समाजातील दिव्यांग, अपंग, गरजू व्यक्तिकरिता असलेली तळमळ उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन डॉ. सायली सोमण यांनी केले.

डॉ. प्रकाश माधव शेठ यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अनामप्रेमने अमृतमहोत्सव व अभिष्टचिंतन सोहळा निंबळक येथे अनामप्रेम- सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात आयोजित केला होता. यावेळी स्नेहालय, अनामप्रेमचे आधारस्तंभ व पालक उद्योजक अरुण (भाई) शेठ, डॉ बापूसाहेब कांडेकर, अविनाश बोपर्डीकर, सेडेमॅक कंपनीचे घनश्याम आठवले, रोटरी क्लब अध्यक्ष नितीन थाडे, सीए सतीश सोमण, अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष अजित माने, डॉ सायली सोमण, प्रा. योगिता काळे, ॲड. श्याम आसावा, भरत कुलकर्णी, डॉ मेघा धामणे, डॉ. चेतन धामणे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. प्रकाश माधव शेठ म्हणाले की, समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून मी काम करत आहे. स्नेहालयाच्या डॉ. गिरीश कुलकर्णीच्या माध्यमातून काम सुरू केले. समाजकार्य करताना अनेक समस्या समजल्या, समाजातील विविध दुर्लक्षित लोकांकरिता काही करता येईल हे मी पाहिले ज्यांना गरज आहे अशांकरीता स्नेहालय, अनामप्रेम संस्था अखंड काम करत आहे अशा संस्था समाजासाठी प्रेरणादायी आहेत घरातील संस्थेकडून होणारा सन्मान महत्वाचा वाटतो यावेळी त्यांनी अनामप्रेमला वेळोवेळी मदत करण्याचे आश्वासन दिले.

प्रास्तविक अजित माने यांनी केले प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण व खेळाच्या मैदानाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. प्रकाश माधव शेठ यांचे ७५ दिवे लावून औक्षण करण्यात आले.

१० व १२ वी दिव्यांग गुणवंत विद्यार्थी, अंध मुलांचे लेखनिक, वाचक, रिक्षा चालकाचा मुलगा आदित्य वडवणीकर एमपीएससी परीक्षेत जीएसटी इन्स्पेक्टर म्हणून निवड तसेच कर्णबधीर देवेंद्र वैद्य याने अखिल भारतीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवल्याबददल व अनाम प्रेम संस्थेमध्ये कार्यरत असणारे कार्यकर्त्यांपैकी २०२३ या वर्षात ज्यांनी उत्कृष्ट काम केले आहे अशा विष्णू वारकरी, राहुल खिरोडे या दोन कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सुरेखा कोतकर यांनी केले. आभार रामेश्वर फटांगडे यांनी मानले.




## राशीभविष्य

- **मेष** : व्यवसायात दिलासा मिळेल. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील. कामाबाबत उत्साह राहील.
- **वृषभ** : निर्णय विचारानं घ्यावेत. आर्थिक अडचणी येतील. गृहसजावटीच्या क्षेत्रात संधी लाभतील.
- **मिथुन** : मनासारख्या घटना घडतील. घरगुती जबाबदाऱ्या वाढतील. थोरामोठ्यांचा सल्ला ध्यानी घ्यावा.
- **कर्क** : कला–गुणांना वाव मिळेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. विवाहाचे प्रयत्न सफल होतील.
- **सिंह** : अचानक धनलाभ संभवतो. गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **कन्या** : दिलासादायक घटना घडतील. महत्त्वाची कामं विचारानं करावी. स्थापत्य क्षेत्रात संधी लाभतील.
- **तूळ** : कामाचा ताण वाढेल. जबाबदाऱ्या विचारानं घ्याव्यात. प्रक्रिया उद्योगात उत्कर्ष होऊ शकेल.
- **वृश्चिक** : आप्तांच्या भेटगाठी होतील. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल.
- **धनु** : आवडत्या क्षेत्रात संधी लाभतील. मनातील नैराश्य दूर होईल. प्रेम प्रकरणात मतभेद संभवतात.
- **मकर** : मौजमजेवर खर्च होईल. कार्यात आनंद, उत्साह राहील. जमीन व्यवहारात पुरेशी काळजी घ्यावी.
- **कुंभ** : महत्त्वाची कामं रखडतील. दुखणी पुन्हा उद्‌भवतील. यांत्रिक क्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील.
- **मीन** : कार्यकर्तृत्त्वाला योग्य वाव मिळेल. व्यवसायात गुंतवणूक वाढीस लागेल. स्थावर सौख्य लाभेल.

## दिनविशेष

**११ जून**

- **१९८३** : ज्येष्ठ उद्योगपती घनश्यामदास बिर्ला यांचे निधन.
- **२०००** : केंद्रीय मंत्री राजेश पायलट यांचे निधन.
- **२०१३** : छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात जखमी झालेले माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विद्याचरण शुक्ल यांचे निधन.
- **२०१७** : राफेल नदाल याने दहाव्यांदा फ्रेंच ओपन स्पर्धा जिंकली.
- **२०१८** : उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जोंग उन आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सिंगापूरमध्ये ऐतिहासिक बैठक.

महत्त्वपूर्ण काही...

## दूर करा व्हायरस

जगातले बहुसंख्य लोक अँड्रॉइड स्मार्टफोन वापरतात. अँड्रॉइड ही ओपन ऑपरेटिंग सिस्टिम आहे. त्यामुळे त्यावर व्हायरस कधीही हल्ला करू शकतो. पण हा व्हायरस काढून टाकता येतो. यासाठी फोन सेटिंगमध्ये जाऊन काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. ✻ पहिल्यांदा फोन किंवा टॅब सेफ मोडमध्ये रिबूट करा. यामुळे थर्ड पार्टी ॲप्ससोबत असलेला व्हायरस आपोआप बंद होईल. सेटिंग्जमध्ये 'सेफ मोड रिबूट'चा ऑप्शन नसेल तर काही वेळ पॉवर बटण दाबून ठेवा. रिबूटचा ऑप्शन सिलेक्ट करून फोन रिबूट करा. ✻ फोन रिस्टार्ट झाल्यावर डिव्हाइस सेटिंगमध्ये जाऊन ॲप्स हा ऑप्शन ओपन करा. इंस्टॉल केलेली सगळी ॲप्स यामुळे ओपन होतील आणि व्हायरस दिसेल. ✻ या यादीत व्हायरस दिसला तर सर्वात आधी तो अनइंस्टॉल करा. डिव्हाइस ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सेटिंगमध्ये इंस्टॉल केलेल्या ॲप्सची सगळी माहिती मिळेल. बिनकामाची ॲप्स अनइंस्टॉल करून टाका. ✻ नको असलेली ॲप्स काढल्यानंतर फोन रिस्टार्ट करा. आता तुमचा फोन सेफ मोडमधून बाहेर येईल आणि त्यातला व्हायरसही निघून जाईल.

आरोग्यमंत्र

## मूत्रात रक्ताच्या गाठी?

मूत्रामध्ये आढळणाऱ्या काही घटकांवरुन बऱ्याचशा आजारांचं निदान होतं. काही वेळा मूत्रात रक्ताच्या गाठी अथवा थेंब दिसतात. सहाजिकच ही बाब घाबरवून टाकते. का जाणवते ही समस्या, जाणून घेऊ या. अंतर्गत आणि बाह्य जखमेमुळे रक्त वाहण्याऐवजी गाठी बनतात आणि शरीरात जमा होतात. या गाठी रक्तप्रवाहात बाधा उत्पन्न करतातच शिवाय मूत्रमार्गामध्ये प्रवेश करुन मूत्राचा मार्गही अडवून ठेवतात. अशा स्थितीत मूत्रत्यागाच्या वेळी वेदना अथवा जळजळ जाणवू शकते. अशा गाठींमुळे किडनीचं कार्य प्रभावित होऊ शकतं. या गाठी डोळ्यांना स्पष्ट दिसणाऱ्या स्थितीला हेमट्यूरिया (रक्तमेह) असं म्हणतात. गाठी अतिसूक्ष्म असून साध्या डोळ्यांना दिसत नसतील तर माइक्रोस्कोपखाली तपासणी करुन निदान केलं जातं. याला माइक्रोस्कोपिक हेमट्यूरिया म्हणतात. अशी लक्षणं किडनीच्या कर्करोगाचे संकेत देतात. त्याचबरोबर ताप येणं, मूत्रमार्गातील जळजळ, मूत्र निर्माण होण्यात अडथळा येणं, प्रोस्टेट कॅन्सर, ब्लॅडर कॅन्सर, शस्त्रक्रिया, अंतर्गत जखमा, किडनी बायोप्सी आदी कारणांमुळेही मूत्रात रक्ताच्या गाठी दिसू शकतात. काही रुग्णांमध्ये रक्तदोष असतो. प्लेटलेट काऊंट इश्यूज, सीकल सेल डिसीज यासारख्या कारणांमुळेही मूत्रात रक्ताच्या गाठी दिसू शकतात. वैद्यकीय तपासणीत ब्लड लीकेजचं नेमकं कारण कळू शकतं.



सल्ला मोलाचा

## कसा हाताळायचा तणाव?

ऑफिसमध्ये सहकर्मचाऱ्यांशी असणाऱ्या मैत्रीत वितुष्ट येण्याचे अनेक प्रसंग येतात. यावेळी विशेष काळजी घ्यायला हवी. ✻ तुमच्याविषयी असुया असणाऱ्या माणसांच्या वागण्याचा आपल्या कामावर काही परिणाम होत आहे का याचा विचार करा. होत नसेल तर काळजी करण्याचं कारण नाही. ही माणसं तुमच्या टीममध्ये नसतील तर प्रश्नच मिटला. ऑफिसमधलं राजकारण आणि गॉसिपपासून लांब रहा. यामुळे इतरांना तुमची प्रतिमा डागाळता येणार नाही. ✻ वाद मिटवण्यासाठी स्वत: पुढाकार घ्या. समोरच्या व्यक्तीशी बोला. समोरासमोर बोलल्याने प्रश्न मिटू शकेल. ✻ सद्यपरिस्थितीचा आणि होत असणाऱ्या गॉसिपिंगचा तुमच्यावर काहीही परिणाम होत नसल्याचं समोरच्या व्यक्तीच्या लक्षात आणून द्या. ऑफिसमध्ये नेहमीप्रमाणे वागा. गप्पा मारा. विनोद करा. ✻ काही माणसं तुमच्यावर कुरघोडी करण्याचा किंवा तुम्हाला मागे खेचण्याचा प्रयत्न करत असतील तर तातडीने एचआर विभागाला हे प्रकरण समजावून सांगा. तक्रार नोंदवा.

## पंचांग

**मंगळवार, ११ जून २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
ज्येष्ठ शु. ५, नक्षत्र : आश्लेषा
चंद्रराशी : कर्क, व्याघात योग
सूर्योदय : ६.०३, सूर्यास्त : ७.१४

## फॉरवर्डस

**बरेचदा प्रेमात जिव्हारी लागणाऱ्या जखमाच मिळतात...**

जख्म खरीद लाया हूं
बाजार ए इश्क से
दिल जिद कर रहा था
मुझे इश्क चाहिए


## ग्रुमिंग

शँपूमध्ये काही नैसर्गिक घटक मिसळून केमिकलचा प्रभाव कमी करता येतो. याविषयी...✻ शँपूमध्ये लिंबाचा रस मिसळल्याने डँड्रफ कमी व्हायला मदत होते. शँपूमध्ये मध मिसळल्याने केसांना छान चमक येते. ✻ शँपू आणि आवळ्याचा रस यांच्या मिश्रणाने डँड्रफची समस्या दूर होते. ✻ शँपूमध्ये गुलाबपाणी मिसळून लावल्याने केसांचा कोरडेपणा दूर होतो.✻ शँपूमध्ये ग्रीन टी मिसळल्याने केस गळणं कमी होतं तसंच केस दाट होतात. ✻ कोरफडीचा रस मिसळल्याने खाज येणं कमी होतं. ✻ ऑलिव्ह ऑईल मिसळल्याने केसांची चमक वाढते.

करिअरवाटा

## आपत्ती व्यवस्थापनातील तज्ज्ञ व्हा

बदलत्या काळामध्ये आपत्ती व्यवस्थापन हा विषय महत्त्वपूर्ण सिद्ध होत आहे. त्यामुळे पर्यावरणशास्त्राचा थोडासा प्रगत अभ्यास आणि आपत्ती व्यवस्थापनाचा प्राथमिक अभ्यास गरजेचा ठरत आहे. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे जीवनामध्ये येणाऱ्या अडचणींचं व्यवस्थापन. या अडचणी नैसर्गिक असोत की मानवनिर्मित, त्या सोडवण्याचं कौशल्य प्रत्येकाकडे असलंच पाहिजे. त्याशिवाय तो चांगल्या प्रकारे जगू शकणार नाही. यापूर्वी काही विद्यापीठांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध होते. परंतु हा विषय असा न शिकवता सर्व पदव्यांच्या वर्गांना आवश्यक म्हणून शिकवावा असे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे हा अभ्यासक्रम व्यापक प्रमाणात उपलब्ध होणं शक्य झालं. तापमानवाढ तसंच हवामानातील बदल यामुळे पुढील काळात नैसर्गिक आपत्तींचं प्रमाण वाढणार असल्याचा इशारा तज्ज्ञ देत आहेत. तो लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात अधिक संख्येनं कुशल मनुष्यबळाची भासणार आहे. त्यादृष्टीने या क्षेत्रात कारकिर्दीच्या अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. हे लक्षात घेता या क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यायला हवा.



खेचाखेची

## अन्यथा...

वटपौर्णिमा जवळ आली आहे. महिलांनो, लक्षात ठेवा, जास्त भारी साडी नेसून आणि भरपूर दागदागिने घालून वडाची पूजा करायला जाऊ नका.

.
.
.
.

अन्यथा शेजारची बाई पुढच्या जन्मी हिचा नवरा मला मिळावा, अशी प्रार्थना करत वडाला प्रदक्षिणा घालेल.

## वेगळं काही


पृथ्वीपासून लाखो प्रकाशवर्षं दूर असलेल्या एका ग्रहाला सहिती पिंगली हे नाव देण्यात आलं. सहिती ही बंगळुरूमध्ये शिकणारी मुलगी आहे. शहरातला एक तलाव प्रदुषित होण्यापासून वाचवण्याचा उपाय सहितीने शोधून काढला. त्यामुळे या ग्रहाला तिचं नाव देण्यात आलं आहे. सहिती इंटरनॅशनल सायन्स फेअरमध्ये सहभागी झाली होती. इथे अर्थ अँड एन्हायन्मेंट सायन्स या विभागात तिला दुसरं पारितोषिक मिळालं होतं. यामुळे साहितीच्या नावाने ग्रहाचं नाव द्यायचं ठरलं. ब्रह्मांडातला एक ग्रह आपल्या नावाने ओळखला जाणं यासारखं भाग्य नव्हे! नाही का?

डाएट मंत्रा

## प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी...

उन्हाळा संपून पावसाळा सुरू होण्याच्या या ऋतूबदलाच्या काळात अनेक संसर्गजन्य आजारांचा प्रादूर्भाव वाढतो. दुपारी कडक ऊन आणि रात्री गारवा अशा वातावरणामुळे प्रतिकारशक्ती कमी असणारे लोक आजारांना बळी पडतात. मात्र आहाराचं पथ्य पाळून आपण या समस्येवर मात करु शकतो. याविषयी...

✻ मुलांच्या आहारात व्हिटॅमीन सी चा समावेश केल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढण्यास मदत होते. ✻ दूध किंवा दुधजन्य पदार्थ मुलांच्या वाढीत महत्त्वाची भूमिका बजावतात. मुलं दूध प्यायला कुरकुरत असल्यास मिल्क शेक किंवा स्मुदीमधूनही दूध देऊ शकता. ✻ मासे प्रोटीनचा उत्तम स्त्रोत आहेत. माशांचं सेवन केल्यास शरीराला भरपूर प्रमाणात प्रोटीन मिळून रोगप्रतिकारशक्तीमध्ये वाढ होते. मासे करी किंवा सूपच्या स्वरूपात द्यावेत. ✻ कोणत्याही ऋतूत सुका मेवा खाणं आरोग्यदायी असतं. पण या काळात मोठ्या प्रमाणावर त्याचे फायदे मिळतात. त्यामुळे या दिवसात मुलांना अक्रोड, बदाम, बेदाणे आवर्जून द्यावेत. यामुळे मुलांना पर्याप्त मात्रेत उर्जा मिळत राहील. ✻ मशरुमध्ये व्हिटॅमीन डी आणि अँटीऑक्सिडंट्स असल्याने त्याचं सेवन वाढवावं.




Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

सोमवार, दि. १० जून २०२४ पान ३

नान्नज, खर्ड्यात पेरणीयोग्य पाऊस; बियाणे खरेदीसाठी गर्दी

# जामखेडमधील काही भाग पावसाच्या प्रतीक्षेत



**अशोक निमोणकर**

**समाचार/जामखेड-दि.१०**

जामखेड तालुक्यातील नान्नज जवळा परिसरात मागील तीन चार दिवसात १५२ मि.मी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे जवळा येथील नांदणी नदीवरील बंधारे ओव्हर फ्लो झाले. तर खर्डा व परिसरात १०६ मि.मी पाऊस झाला आहे. या दमदार पावसामुळे शेतकरी पेरण्याच्या तयारीत असून उडीद, तुर, सोयाबीन बियाणे खरेदीसाठी झुंबड उडाली आहे. तर जामखेड अरणगाव व नायगाव परिसरात अत्यल्प पाऊस आहे. या तीन चार दिवसात चांगला पाऊस पडला तरच पेरण्या होण्याची शक्यता आहे. शहर व तालुक्यात पुरेशा प्रमाणात खते, बियाणे उपलब्ध असल्याने टंचाई भासणार नाही. जामखेड तालुक्यातील पाच मंडलापैकी खर्डा व नान्नज मंडलात पेरणीयोग्य पाऊस तर जामखेड अरणगाव व नायगाव मंडलात अत्यल्प पाऊस असल्याने पेरण्या लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. खरिप हंगाम यशस्वी करण्यासाठी कृषी खात्याने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

जामखेड तालुका रब्बीचा तालुका म्हणून ओळखला जातो. परंतु खरीप हंगामातील तीन, साडेतीन महिन्यात येणारे नगदी पिके म्हणून उडीद, सोयाबीन, तुर यापिकावर जास्त भर शेतकरी देतो. त्यादृष्टीने शेतीची मशागत पूर्ण झाली आहे. मे महिन्यात अवकाळी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला पण त्याने नुकसान जास्त पाऊस कमी होता. शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असताना जुन महीन्यातील चार तारखे पासून जामखेड तालुक्यात पावसाला सुरुवात झाली. तालुक्यातील नान्नज, जवळा परिसर मागील तीन वर्षांपासून दुष्काळाच्या खाईत होता. यावर्षी मात्र जुन महीन्याच्या सुरवातीला दि.४ रोजी ६६.०८ मि.मी, दि. ६ रोजी ४१.८ मि.मी., दि.७ रोजी ४४ मि.मी असा एकूण १५२ मि.मी. जोरदार पाऊस सलग तीन दिवस झाला. यामुळे ठिकठिकाणी खड्ड्यात पाणी साचले तसेच नांदणी नदीला पाणी आले व बंधारे ओव्हर फ्लो झाले. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची तयारी झाली आहे.

खर्डा परिसरात दि. ४ रोजी ७.५ मि.मी.,दि.६ रोजी ४१.८ व दि.७ रोजी ५७.३ असा एकूण १०६ मि.मी. पाऊस झाला आहे. खर्डा, नान्नज ,जवळा या परिसरात १०० मि.मी पेक्षा जास्त पाऊस झाला व जमीनीत आवश्यक ओल निर्माण झाली आहे. हा पाऊस पेरणीसाठी योग्य झाला असून खर्डा, नान्नज व जवळा येथील शेतकरी वापसा होण्याची वाट पहात आहे. तर जामखेड ५५मि.मी, अरणगाव २६ मि.मी व नायगाव ४१ मि.मी पाऊस मागील तीन दिवसात पडला परंतु जमिनीची धग कायम आहे. मात्र वातावरणात प्रचंड प्रमाणात उकाडा वाढला आहे.

# अर्बन बँकेची एक रकमी परतफेड योजना

**समाचार/नगर-दि.१०**

रिझर्व बँकेने नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा बँकिंग परवाना रद्द केल्यानंतर केंद्र शासनाने बँकेवर नोव्हेंबर २०२३ मध्ये अवसायक म्हणून एनसीडीसीचे उपसंचालक गणेश गायकवाड यांची नियुक्ती केली होती. दरम्यानच्या सात महिन्यांच्या कालावधीमध्ये ७ जून अखेर बँकेच्या एकुण कर्जा पैकी रुपये १६ कोटी ७० लाख वसूल करण्यात आले आहेत. मात्र थकीत कर्ज वसुलीला गतिमान करण्यासाठी बँक प्रशासनाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शननुसार एकरकमी कर्ज परतफेड योजना ५ जुन २०२४ पासून सुरू करण्यात आली असल्याचे अवसायक तथा एनसीडीसी चे उपसंचालक गणेश गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात १७२०० ठेवीदारांचे रुपये २९३.५७ कोटी डीआयसीजीसीच्या (भारतीय रिज़र्व बैंक) माध्यमातून परत करण्यात आले असून १५८५७ ठेवीदारांच्या क्लेम फॉर्मची पुर्तता झालेली असून त्यांचे रुपये ६१.८१ कोटी डीआयसीजीसीच्या (भारतीय रिज़र्व बैंक) माध्यमातून लवकरच परत करण्यात येणार आहे. त्याचे काम अंतिम टप्यात आले आहे.या एक रकमी कर्ज परतफेड योजनेमुळे कर्जदार स्वतःहून मोठ्या प्रमाणात कर्ज थकबाकी भरून आपले कर्ज खाते निल करण्याच्या दृष्टीने पुढे येतील अशा विश्वास अवसायक गायकवाड यांनी व्यक्त केला. या योजनेमुळे मोठ्या प्रमाणात थकीत कर्ज वसुली होऊन रक्कम ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याचा मार्ग सुलभ होणार आहे. त्यामुळे सर्व थकीत कर्जदारांनी या एक रकमी परतफेड (ओटीएस) योजनेचा लाभ घेऊन संभाव्य कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी आपली थकबाकीची रक्कम लवकरात लवकर भरून बँक प्रशासनास सहकार्य करावे, त्याचबरोबर सर्व खातेदार व ठेवीदार यांनी आपापले केवायसी कागदपत्र नजीकच्या शाखेत जमा करून ठेवी परत मिळवण्यासाठी क्लेम फॉर्म देखील लवकरात लवकर भरून द्यावेत असे आवाहन अवसायक गायकवाड यांनी केले आहे. थकीत कर्जाची वसुली करून ठेवीदारांना त्यांचे कष्टाचे पैसे परत करण्यासाठी बँक प्रशासन प्रयत्नशील असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

## निधन वार्ता

### मोहन वाघ



**समाचार/नगर-दि.१०**

कल्याण रोड महालक्ष्मी मंगल कार्यालय जवळील रहिवासी मोहन (नाना) बाबुराव वाघ यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते अत्यंत धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी,पाच मुली,एक मुलगा,सूना नातवंडे,जावई असा मोठा परिवार आहे.

### विलास सुरसे




**समाचार/नगर-दि.१०**

नेवासा तालुक्यातील जैनपूर येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रगतशील शेतकरी विलास गोरक्षनाथ सुरसे (वय ५७) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मनमिळावू स्वभावाचे विलास यांचा गावातील धार्मिक कार्यक्रमातही सहभाग होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, भाऊ, चुलते, नातवंडे, पुतणे असा परिवार आहेत. नगर येथील डॉक्टर सुनील सुरसे यांचे ते बंधू तर अमोल सुरसे यांचे ते वडील होत.

# जामखेडनजीकच्या अपघातात दोनजण ठार; तीन गंभीर जखमी

**समाचार/जामखेड-दि.१०**

जामखेड खर्डा रस्त्यावर बटेवाडी शिवारात एसटी बस व चारचाकी वाहनाचा समोरासमोर रात्री साडेबाराच्या सुमारास भिषण अपघात झाला यामध्ये पाच जण गंभीर जखमी झाले त्यांना जामखेड येथील खाजगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करून पोलिसांनी नगर येथील सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी पाठवले होते उपचार घेत असताना त्यातील दोन जण मृत्यु पावल्याचे जाहीर केले असून तीन जणांवर उपचार चालू आहे.



याबाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, जामखेड खर्डा रस्त्यावर बटेवाडी शिवारात कोपरगाव आगाराची शिर्डी हैदराबाद बस शिर्डी येथे जात असताना रात्री साडेबाराच्या सुमारास एस.टी. क्रमांक M H ०९ FL १०२७ व वडगाव गुप्ता अहमदनगर येथील चारचाकी वाहन क्रमांक (एम एच १६ ए टि ६४९२) या दोन वाहनाची समोरासमोर धडकून भिषण अपघात झाला. याबाबत ११२ क्रमांकावरून जामखेड पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना फोन झाला असता त्यांनी तातडीने पेट्रोलिंग वाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक गौतम तायडे, पोलीस कॉन्स्टेबल देवीदास पळसे,पोलीस कॉन्स्टेबल संतोष भोरे वाहनचालक अडसुळ व १०८ क्रमांक व सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी मदतीसाठी रुग्णवाहिका पाठवली.

विजय गंगाधर गव्हाणे २४, पंकज सुरेश तांबे २४ मयुर संतोष कोळी वय १८ सचिन गिते वय २८ अमोल डोंगरे वय ३० सर्वजण वडगाव गुप्ता रा. अहमदनगर येथील असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार जामखेड येथील खाजगी रुग्णालयात करून अहमदनगर येथे सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवले उपचार सुरू असताना त्यातील विजय गंगाधर गव्हाणे २४, पंकज सुरेश तांबे (रा. वडगाव गुप्ता नगर) हे मयत झाले आहे, मयूर संतोष कोळी हे अत्यावस्थ आहे.

## पान १ वरुन

### नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान

काल झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह एकूण ७१ नवनिर्वाचित खासदारांनी पदाची शपथ घेतली. मोदी वगळता उरलेल्या ७० मंत्र्यांपैकी ६० मंत्री हे भाजपाचे आहेत. इतर १० मंत्र्यांमध्ये नितीश कुमारांची जेडीयू, चंद्राबाबू नायडूंची टीडीपी, रामदास आठवलेंची रिपाइं, एकनाथ शिंदेंची शिवसेना अशा इतर मित्रपक्षांचा समावेश आहे. ही मंत्रीपदं कॅबिनेट मंत्री, स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री व इतर राज्यमंत्री अशी विभागली गेली आहेत. शपथ घेतलेल्या मंत्र्यांचे खातेवाटप करण्यात आलेले नाही. येत्या काही दिवसांतच जाहीर केलं जाण्याची शक्यता आहे. सध्या तीन प्रकारच्या मंत्रीपदांची पुढीलप्रमाणे वाटणी करण्यात आली आहे.

### पावसाचा नगरकरांना दिलासा

पाऊस रात्री उशिरापर्यंत पडत होता. त्यामुळे वातावरणात चांगलाच गारवा निर्माण झाला आहे. प्री मान्सूनच्या पावसाने नगर शहराबरोबरच आसपासच्या ग्रामीण भागात देखील चांगली हजेरी लावली आहे. हवामान खात्याच्या आकडेवारीनुसार काल झालेल्या पावसाची नगर शहरात ३५.६ मिलिमीटर इतकी नोंद झाली असून सर्वात जास्त नोंद जामखेड येथे झाली. आठवड्यामध्ये सर्वात जास्त पाऊस कर्जत तालुक्यात पडला असून जिल्ह्याची सरासरी ३६.१ इतकी आहे जी सरासरीपेक्षा १०२ टक्के अधिक आहे. जिल्ह्यात सर्वत्र मान्सून ने लावलेल्या समाधानकारक हजेरीमुळे सर्वत्र शेतीच्या कामांना उत्साह आलेला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवलेला आहे.

### बालेकिल्ल्याचे गतवैभव नगरला पुन्हा मिळवा

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे अभिनंदन आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी सत्कार केला. यावेळी संपतराव म्हस्के, बाबासाहेब गुंजाळ त्यांच्या समवेत उपस्थित होते. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या लढतीमध्ये नगर जिल्ह्यात दोन्ही जागा महाविकास आघाडीला मिळवण्यासाठी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जे प्रयत्न केले इतर मित्र पक्षांना सोबत घेऊन आपापल्या उमेदवारांना बळ दिले. माजी मंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने केलेल्या विशेष प्रयत्नामुळे दोन्ही जागा आपण मिळवू शकलो. बाळासाहेब थोरात यांनी राज्यातही आपल्या नेतृत्वाचा प्रभाव टाकत जास्तीत जास्त जागा महा विकास आघाडीच्या पदरात पाडून घेण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले याबद्दल पटोले यांनी आनंद व्यक्त केला.

### पारनेरमध्ये खरीप हंगामाच्या आशा पल्लवीत

खरीप हंगामात तालुक्यात परंपरेने मूग, बाजारी,मका, कडवळ व इतर चारा पिके प्रामुख्याने घेण्यात येतात.मात्र गेल्या काही वर्षांपासून वाटाणा पेरणीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्याचबरोबर सोयाबीनची पेरणी करण्यात येते. मूग तोडणीसाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने मुगाचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत चालले आहे.



# वंदे मातरम युवा प्रतिष्ठानतर्फे नगरमध्ये जल्लोष

**समाचार/नगर-दि.१०**

नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान पदावर विराजमान झाले. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून वंदे मातरम युवा प्रतिष्ठानच्या वतीने वंदे मातरम चौकात मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला.

संध्याकाळी ७:१५ वाजता, वंदे मातरम चौकात वंदे मातरम युवा प्रतिष्ठानच्या सदस्यांनी बाजारपेठेतील व्यापारी, कापड बाजार श्री गणेश मित्र मंडळ आणि व्यापारी महासंघाच्या सभासदांच्यावतीने मोदी शपथ विधीचे सुवर्णक्षण साजरे केले. गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी, आणि सर्वांचे तोंड गोड करत वनफे मातरम प्रतिष्ठान मार्फत लाडू वाटप करण्यात आले. दिल्लीतील राष्ट्पती भवनात नरेंद्र मोदी यांच्या शपथ विधीचा सोहळा सुरू होताच, उपस्थितांनी 'जय श्रीराम' आणि 'वंदे मातरम' च्या जयघोषांनी संपूर्ण बाजारपेठ दुमदुमून टाकली. व्यापारी संघाचे अध्यक्ष ईश्वर बोरा, प्रतीक बोगवत, महावीर कांकरिया यांची भाषणे झाली.

# जि.प.कर्मचारी सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत

# विषयपत्रिकेवरील सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी

**समाचार/नगर-दि.१०**

गेल्या ९७ वर्षांची उत्कृष्ट परंपरा आणि लौकिक असलेल्या अहमदनगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीचा कारभार आणि संस्थेकडून सभासदांसाठी राबविले जाणारे उपक्रम जिल्ह्यातील इतर सहकारी संस्थांसाठी पथदर्शक असल्याचे गौरवोद्गार जिल्हा परिषदेचे आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे यांनी काढले.संस्थेच्या संचालक मंडळाने आणि सर्व सभासदांनी संस्थेचा लौकिक या पुढील काळात आणखी वाढवावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



अहमदनगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीची ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि ९) नगर मधील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, तर प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक डॉ. संजय कळमकर हे उपस्थित होते. प्रारंभी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सन्मान चिन्ह व रोख बक्षिसे देवून करण्यात आला.

यावेळी डॉ. कळमकर यांनी आपल्या विनोदी शैलीत उपस्थितांना मनमुराद हसवत सध्याच्या सामाजिक प्रश्नांवर तसेच सोशल मीडियामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर विनोदी शैलीत चिमटे काढले. प्रास्ताविक अध्यक्ष योगेंद्र पालवे यांनी करत संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या सभेत संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार पोटनियम दुरुस्ती, सभासद कर्ज मर्यादा १८ लाखापर्यंत वाढविणे, सभासद कुटुंब आधार योजनेत मयत सभासदांचे १५ लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचा ठराव कायम करणे, यासह विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सभेस उपाध्यक्ष डॉ. दिलीप डांगे, संचालक विलास शेळके, प्रशांत मोरे, विक्रम ससे, चंदकांत संसारे, इंजी. राजू दिघे, भाऊसाहेब चांदणे, ऋषीकेश बनकर, स्वप्नील शिंदे, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, अर्जुन मंडलिक, श्रीमती ज्योती पवार, सुरेखा महारनुर, मनिषा साळवे, दीपक गोधडे, नितीन चोथवे, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे व कर्मचारी वृंद तसेच जिल्हाभरातून आलेले सभासद उपस्थित होते.

**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## मुंबई शेअर भाव

**मान्सूनचे आगमन आणि नव्या सरकारची स्थापना रोखीच्या गटात प्रचंड मागणी**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक १०-६-२०२४**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७६८३० |
| एसीसी | २५४६-४७ |
| एशियन पेंट | २९४३-४४ |
| बजाज ऑटो लि. | ९७२०-२१ |
| बलराम फूड चिनी | ३९७-९८ |
| भारत फोर्ज | १५६९-७० |
| क्रॉम्प्टन | ४१४-१५ |
| डीएलएफ | ८५१-५२ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ६१२०-२१ |
| ग्रॅफाईट इंडिया | ८७०-७१ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २५६९-७० |
| आयटीसी लि. | ४३८-३९ |
| एल ॲण्ड टी लि. | ३१६२-६३ |
| रिलायन्स इंड. | २९६५-६६ |
| एसबीआय | ८३७-३८ |
| टाटा मोटर्स | ९७२-७३ |
| टाटा स्टील | १८१-८२ |
| टीसीएस | ३८६२-६३ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २४५-४६ |
| सुवेन फार्मा | ८८५-८६ |

PDF Compressor Free Version



# सकारात्मक विचारातून सामाजिक बांधिलकी जपा- जगताप

समाचार/नगर-दि.१०



समाजामध्ये वावरत असताना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची जाण असणे गरजेचे आहे गरजूवंतांना मदतीच्या भावनेने आधार देण्याचे काम आपल्या सर्वांना करायचे आहे म्हणून सकारात्मक विचारातून चांगले काम उभे राहत असते बालघर प्रकल्प येथील गरजूवंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, जेणेकरून उद्याची युवा पिढी चांगली निर्माण होईल, सण उत्सव वाढदिवस साजरे करीत असताना सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सामाजिक बांधिलकी जोपासवी असे असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

तपोवन रोड बालघर प्रकल्प येथे अहमदनगर जिल्हा कामगार संघटनेच्या वतीने आमदार जगताप यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष संतोष लांडे, कामगार कामगार प्रतिनिधी दादासाहेब सुद्रिक, लक्ष्मण तोडमल, अजिनाथ शेवाळे, संतोष भिंगारदिवे, सुरेश साळवे, बाळकृष्ण शिंदे, अरुण घोलप, चंद्रकांत शेटे, अमित मिसाळ, संतोष गिरंगे, बापू गवते, दिनेश मरकड, पांडुरंग कराळे, दर्शन तोडमल, विशाल देवकाते, मेघराज सुद्रिक, योगेश घाडगे, युवराज्य गुंड आदी उपस्थित होते. कामगार प्रतिनिधी दादासाहेब सुद्रिक म्हणाले यांचे भाषण झाले.

# मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबीर



समाचार/नगर-दि.१०

आज ग्रामीण भागात अशा मोफत शिबीरांची गरज असून, यापुढील काळात असे मोफत शिबीरे गावात व पंचक्रोशित वेळोवेळी घेऊन ग्रामस्थांना त्याचा लाभ देण्याचा प्रयत्न करु, असे प्रतिपादन ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धिवर यांनी केले. नगर तालुक्यातील कौडगाव जांब येथील संत लक्ष्मण महाराज मठ येथे स्नेहालय संचालित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर हॉस्पिटल व कौडगाव जांब ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ग्रा. पं.सदस्य बाबासाहेब धिवर, सदस्य सोमनाथ कांडके, पोपट कांडके, देविदास धिवर, राजू खरसे, अंगणवाडी सेविका हेमा कांडेकर, महिला बचत गटाच्या सदस्य स्वाती लिपने, राणीताई धिवर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. गावातील शालेय विद्यार्थी यांच्या हस्ते या शिबिराचे दीप प्रज्वलन करून शिबिराला सुरुवात करण्यात आली. या शिबिरामध्ये २५० ग्रामस्थ व महिलांची तपासणी करून औषधे देण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना लांडे, प्रशासकीय अधिकारी अजिंक्य भिंगारदिवे, पीआरओ मंगेश दरडे, ओआरडब्ल्यू सुधीर पावखे, परिचारिका हेमा, कृष्णा आदींचे या शिबिरासाठी सहकार्य लाभले.

शिबीर यशस्वीतेसाठी कांचन ताकमोडे, विद्या तोडकर, शितल धिवर, अर्चना धिवर, छाया धिवर, उषा पोटकुले आदिंनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सोमनाथ कांडके यांनी केले तर देवीदास धिवर यांनी आभार मानले.

# एनसीसीच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ



समाचार/नगर-दि.१०

१७ व्या महाराष्ट्र बटालियन नॅशनल कॅडेट कॉर्प्स (NCC) तर्फे ०६ ते १५ जून २०२४ रोजी नगर येथील आर्म्ड कॉर्प्स कॉलेज आणि स्कूलमध्ये त्यांचे एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शिबिर – २०७ आयोजित केले आहे. या शिबिराचा नुकताच प्रारंभ करण्यात आला.

या शिबिरामध्ये एकूण दोन अधिकारी, १२ कायमस्वरूपी प्रशिक्षक, १२ नागरी कर्मचारी, ०४ सहयोगी NCC अधिकारी आणि ४४५ कॅडेट्स (२८४ मुले आणि १६१ मुली) शिबिरात सहभागी आहे. कर्नल चेतन गुरुबक्ष यांनी ७ जून २०२४ रोजी त्यांच्या सुरुवातीच्या भाषणात उत्साही कॅडेट्सचे स्वागत केले. कॅडेट्सना संबोधित करताना त्यांनी शिबिराची मुख्य उद्दिष्टे अधोरेखित केले. एनसीसी शिबिरे कॅडेट्समध्ये आवश्यक गुण विकसित करण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करतात यावर त्यांनी भर दिला. यामध्ये नेतृत्व, सौहार्द, संघकार्य, आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि श्रमिकांच्या प्रतिष्ठेचा आदर यांचा समावेश होतो. अशी मूल्ये शिस्तबद्ध आणि तत्त्वनिष्ठ जीवनाचा पाया बनतात. शेवटी कॅडेट्सना उद्याचे भविष्यातील नेते म्हणून तयार करून जबाबदार नागरिक बनवणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या शिबिरांदरम्यानच्या प्रशिक्षणाची रचना कॅडेट्सना सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत शिस्तबद्ध जीवनशैलीचा परिचय देण्यासाठी करण्यात आली आहे. या शिबिरात कर्नल चेतन गुरुबक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रशिक्षकांची समर्पित टीम, १७ वी महाराष्ट्र बटालियन एनसीसी तरुणांना प्रेरणा आणि सशक्त करत आहे, त्यांना जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये उत्कृष्ट होण्यासाठी तयार करत आहे.

## सकल माळी समाजाचा वर्धापन दिन उत्साहात

# समाज एकत्र आल्याने आदर्शवत काम- डागवाले

समाचार/नगर-दि.१०



सकल माळी समाजाच्या कामाला सुरुवात होवून एक वर्ष पूर्ण होत आहे.समाजाने जो अजेंडा ठरविला होता त्यातील काही कामे पूर्णत्वास येण्याची सुरुवात झाली आहे.सकल माळी समाज एकत्रित आल्याने आदर्शवत असे काम नगर शहरात उभे राहील. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिकेकडून जागा मिळाली आहे.तसेच सारस नगरचे सावित्रीबाई फुले नगर नामकरण कमानीचे काम प्रगती पथावर आहे. तसेच महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचेही काम लवकरच पूर्ण होईल. यासाठी शहरातील लोकप्रतिनिधी, सर्व नगरसेवक व प्रशासन यांचे सहकार्य लाभले आहे, असे प्रतिपादन सकल माळी समाज ट्रस्टचे नूतन अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

तारकपूर येथे सकल माळी समाज ट्रस्टच्या वर्धापन दिनानिमित्त माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.या बैठकीत सकल माळी समाज ट्रस्ट नूतन अध्यक्षपदी किशोर डागवाले, उपाध्यक्षपदी बाळासाहेब भुजबळ, सचिवपदी राजेंद्र पडोळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

याप्रसंगी माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, जि.प.सदस्य शरद झोडगे, प्रा.माणिक विधाते, अर्जुन बोरुडे, संतोष म्हस्के, संजय गारुडकर, प्रा.सुनील जाधव,सुरेश आंबेकर, डॉ.रणजित सत्रे, विनोद पुंड, प्रकाश शिंदे, आनिल इवळे,अमोल भांबरकर,डॉ. दामोधर कळमकर, डॉ.कैलास मेहेत्रे, नितीन भूतारे, अॅड.राहुल रासकर, जालिंदर बोरुडे,गजानन ससाने सुष्मा पडोळे आदी उपस्थित होते. प्रा.माणिक विधाते, संजय गारूडकर, अनिल बोरूडे, शरद झोडगे यांचेही भाषण झाले.

# मेगा प्लास्टिक्स प्रदर्शन PLEXCONNECT २०२४ यशस्वीपणे संपन्न



प्लास्टिक्स निर्यात प्रचार परिषदद्वारे ७-९ जून रोजी बॉम्बे प्रदर्शन केंद्रात आयोजित करण्यात आलेले मेगा प्लास्टिक्स प्रदर्शन PLEXCONNECT 2024 यशस्वीपणे संपन्न झाले, ज्यामुळे पुन्हा एकदा भारत प्लास्टिक्स उत्पादने आणि यंत्रणांसाठी एक आघाडीचे जागतिक स्त्रोत ठिकाण म्हणून दृढपणे स्थापित झाले आहे.

तीन दिवसीय प्रदर्शन आणि परिषद भारतातील आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदारांच्या प्लास्टिक्स समुदायाच्या उत्साही सहभागाने सुरू झाली. ५०+ प्रमुख आयात करणाऱ्या राष्ट्रांमधून ४०० हून अधिक परदेशी खरेदीदार भारतात आले आणि भारतीय निर्यातदारांशी संपर्क साधण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी आले. या देशांमध्ये अझरबैजान, बांगलादेश, बेल्जियम, बेनिन, ब्राझील, कॅमेरून, कॅनडा, चिली, कोस्टा रिका, इजिप्त, इथिओपिया, जर्मनी, घाना, ग्वाटेमाला, केनिया, किर्गिस्तान, मॉरिशस, म्यानमार, नेपाळ, पेरू, पोलंड, रशिया, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, श्रीलंका, तांझानिया, युगांडा, संयुक्त अरब अमिरात, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, व्हिएतनाम, उझबेकिस्तान, आणि झिम्बाब्वे यांचा समावेश आहे. मुख्य अतिथी रविश कामथ, PLEXCONCIL चे अध्यक्ष हेमंत मिनोचा; उपाध्यक्ष विक्रम भदौरिया; माजी अध्यक्ष अरविंद गोएंका; Plexconnect 2024 संयोजक ध्रुव सायनी, आणि कार्यकारी संचालक, श्रीबास दामोहपात्रा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या दुसऱ्या संस्करणात ऑल टाईम प्लास्टिक्स, ऑटोटेक समॅक्स, अवी ग्लोबल प्लास्ट, बिग बॅग्स इंटरनॅशनल, बुबना पॉलीसॅक, डालमिया पॉलीप्रो, डायनेस्टी प्लास्टिक्स, फॅमिली प्लास्टिक्स अँड थर्मोवेअर, फ्लेअर रायटिंग इंडस्ट्रीज, जेमकॉर्प रीसायकलिंग, ममता मशीनरी, मेचेमको इंडस्ट्रीज, पाशुपति एक्सक्रुशन, प्रायमा प्लास्टिक्स, आरएमर्जी युनिलोय प्लास्टिक्स मशीनरी आणि इंडस्ट्री असोसिएशन्स यांचा समावेश होता.

# वेल्सच्या वैज्ञानिक सल्लागारांचे भारतीय समकक्षांना अर्थव्यवस्थेबाबत मार्गदर्शन

वेल्स सरकार भारतातील एक वर्षापासून कार्यरत असलेल्या वेल्सच्या कामगिरीला साजरे करत असताना वेल्सचे चीफ सायंटिफिक अडवायजर (सीएसए) प्रा. जॅस पाल बादयाल एफआरएस यांनी या आठवड्यात भारताचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा. अजय के. सूद एफआरएस यांची भेट घेतली आहे. या भेटीदरम्यान वेल्सची आघाडीची चक्रिय अर्थव्यवस्था, मेड-टेक आणि अॅग्री-टेक क्षेत्रांबाबत चर्चा करण्यात आली.

प्रा. अजय के. सूद भारतातील विज्ञान व तंत्रज्ञानासंदर्भात सर्वात प्रभावी धोरणकर्ते आहेत. ते देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय धोरणात्मक वैज्ञानिक बाबींबाबत सरकारच्या मंत्रिमंडळाला सल्ला देतात. ही भेट प्रा. बादयाल यांच्यासाठी नवी दिल्ली, बेंगळुरू व मुंबईमधील क्रियाकलपांच्या सिरीजचा भाग आहे, जेथे जगातील अग्रगण्य वैज्ञानिक, तंत्रज्ञान उद्योजक आणि सल्लागार वेल्स तंत्रज्ञान व अत्याधुनिक विज्ञान व्यवसायामधील सहयोग आणि गुंतवणूकीसाठी संधींचा चालना देत आहेत. भारतात वर्षभर कार्यरत असलेल्या वेल्सने दोन्ही देशांमधील इच्छुक पार्टीदरम्यान धोरणात्मक संबंध यशस्वीपणे स्थापित केले आहेत.

# दावणगेरे शुगर कंपनी लि.ची क्षमता ४५ KLPD ने वाढणार

दावणगेरे शुगर कंपनी लि (DSCL) (बीएसइ : 543267, एन एस इ : DVNGERE), शुगर, सस्टेनेबल पॉवर आणि इथेनॉल सोल्युशन्समधील आघाडीची कंपनी, असून तिच्या डिस्टिलरी आणि ऑपरेशन्सच्या विस्ताराची कंपनीने घोषणा केली आहे. ५४.०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाच्या खर्चात आणखी 45 KLPD धान्य-आधारित युनिट जोडून. ग्रेन डिस्टिलरीची अतिरिक्त क्षमता 45 KLPD ने वाढवली आहेबँकांशी आर्थिक करार पूर्ण झाला असून नागरी कामांमध्ये सुमारे 2.00 कोटी रुपये गुंतवले आहेत. यंत्रसामग्री पुरवठादारांशी वाटाघाटी पूर्ण झाल्या. कंपनी आणि स्थानिक कृषी समुदायासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. डिस्टिलरीचा विस्तार करण्याच्या हेतूने कंपनीला आता वर्षातील 330 दिवस स्वतंत्रपणे काम करण्याची परवानगी मिळेल, ज्यामुळे स्थिर आणि मजबूत उत्पादन चक्र सुनिश्चित होईल. स्थानिक शेतकऱ्यांकडून थेट मका, तांदूळ आणि इतर खाद्य साठा वाढवल्यामुळे ही वाढ शक्य झाली आहे. जवळच्या कृषी भागीदारांकडून हे आवश्यक घटक मिळवून, कंपनी स्थानिक अर्थव्यवस्थेला पाठिंबा देण्यासाठी आणि शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी आपली वचनबद्धता मजबूत करते. दावणगेरे कंपनीचे एमडी श्रीगणेश म्हणाले, आम्ही स्थानिक शेतकऱ्यांसोबतचे आमचे सहकार्य अधिक सखोल आणि बळकट करण्यासाठी रोमांचित आहोत. त्यांचे दर्जेदार पिके इथेनॉल निर्मितीसाठी आधारशिला आहेत आणि या विस्तारामुळे आम्हाला अधिक नोकऱ्या निर्माण करता येतात, स्थानिक उत्पन्न वाढवता येते आणि वर्षभर आमचे उच्च दर्जा टिकवून ठेवता येतो. विस्तारामुळे केवळ डिस्टिलरीची उत्पादन क्षमता वाढते असे नाही तर शेतकऱ्यांना एक विश्वासार्ह बाजारपेठही मिळते. त्यांच्या उत्पादनासाठी हे परस्पर फायदेशीर नातेसंबंध प्रदेशाच्या कृषी क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याचे वचन देतात, सर्व सहभागींना स्थिरता आणि वाढीच्या संधी प्रदान करतात.कंपनीच्या प्रमुख उपक्रमांपैकी एक म्हणजे विद्यमान ऊस लागवड क्षेत्रे आणि परंपरेने ऊस लागवडीशी संबंधित नसलेल्या प्रदेशांमध्ये 15000 एकरपर्यंत ऊस पिकांना प्रोत्साहन देणे आणि विकसित करणे हे आहे.

# मॅग्निफ्लेक्स इंडियातर्फे मॅग्निजिओची सुरुवात

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मॅग्निफ्लेक्स या लक्झरी मॅट्रेस ब्रॅन्डतर्फे आज मॅग्निजिओ या नवीन मॅट्रेसेसची सुरुवात करत असल्याची घोषणा केली. या मॅट्रेसेस सर्वोत्कृष्ट आराम देणाऱ्या तर आहेतच पण त्याच बरोबर शाश्वत पर्यावरणाचीही हमी देतात. जागतिक स्तरावरील वाढते तापमान आणि पर्यावरणाचा होणारा त्रास पाहता असे दिसून येते की आपली पृथ्वी ही मोठ्या संकटाच्या तोंडावर उभी आहे. मॅग्निजिओची सुरुवात करुन मॅग्निफ्लेक्स इंडियाने आता शाश्वत भविष्याकडे आपला प्रवास सुरु केला आहे. मॅग्निफ्लेक्सने अशी योजना आखली आहे की प्रत्येक मॅग्निजिओच्या खरेदीनंतर ग्राहकांच्यावतीने एक झाड लावण्यात येणार असून त्याचे प्रमाणपत्र हे त्यांच्या किंवा त्यांच्या वारसदाराच्या नावे देण्यात येणार आहे. मॅग्निजिओ मॅट्रेसेसची निर्मिती ही रिजनरेटेड फोमचा वापर करुन केलेली आहे, यामध्ये कोणत्याही प्रकारच्या घातक एक्स्पान्डिंग एजंट्सचा वापर केलेला नाही. यामुळे पाठीच्या कण्याला आराम मिळण्यास मदत हेऊन मेमोफोम पॅडिंग मुळे शरीराचा आकार सुस्थितीत राहतो. यातील ब्रिदेबल फायबर्स मुळे आराम वाढून, यातील 'नो वेस्ट' फॅब्रिकमुळे मुलामयमपणा टिकून राहतो.

लोकार्थ

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ - १८१

**खाली दिलेल्या चौकोनात लेखक गो. नी. दांडेकर यांची १० पुस्तक लपलेली आहेत. शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प | मा | चीं | व | र | ला | बु | धा |
| ड | जे | रा | कृ | ड | मृ | स | दु |
| घ | त | न | ष्ण | सो | ण्म | प | र्ग |
| व | रे | भू | चे | मी | यी | ळ | द |
| लीं | जे | ल | ध | री | व्य | स | र्श |
| वा | त | वा | घ | रू | गो | हो | न |
| शि | डे | र | शीं | चीं | रा | गीं | कि |
| तू | लीं | मे | स्म | र | ण | गा | था |

## शब्दखेळ - १८० चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बॉ | अ | न | प | ढ | अ | शा | दीं |
| य | ह | खो | क | इं | दृ | प | प |
| फ्रें | की | शो | ब्ब | शि | ष्टीं | दे | कि |
| ड | क | ले | डीं | का | के | व | री |
| ने | त | र | ता | र | अं | र | न |
| बं | पा | दो | मा | का | र | डीं | तीं |
| दि | ट्या | र्णि | वा | चौ | क्ष | लीं | सो |
| नीं | पू | ला | फे | का | ज | ल | ट |

PDF Compressor Free Version



## केडगाव, मराठानगर येथे ड्रेनेज कामाचा शुभारंभ

# ड्रेनेजचा प्रश्न मार्गी लागल्याचे समाधान - कोतकर

**समाचार/नगर-दि.१०**

गेल्या काही वर्षांपासून केडगांव परिसरात चांगली विकास कामे उभी राहिली आहे. प्रभागातील नागरिकांच्या समस्यां सोडविण्यासाठी प्रत्येक पातळीवर काम करुन अनेक कामे मंजूर करुन ती पूर्ण केली आहे. प्रत्येक भागातील नागरिकांना सर्व सुविधा मिळाव्यासाठी यासाठी आपण कायम प्रयत्नशिल राहिलो आहोत. नगरसेवक पदाचा कार्यकाळ संपला असला तरी मंजूर कामे मार्गी लावत आहोत. ती कामे आता पुर्ण करण्यात येत आहेत. नागरिकांच्या सहकार्याने आपल्या प्रभागातील कामांना चालना मिळाली आहे. या भागातील ड्रेनेज लाईनचा महत्वाचा प्रयत्न आज मार्गी लागत असल्याचे समाधान आहे. यापुढील काळातही अशाप्रकारे कार्यरत राहू, असे



प्रतिपादन माजी नगरसेविका सुनिता कोतकर यांनी केले.

शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका सुनिता कोतकर यांच्या प्रयत्नातून केडगांव येथील मराठानगर (लालानगर) येथील ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ झाला. याप्रसंगी केडगांव शिवसेना विभागप्रमुख संग्राम कोतकर, युवा सेना शहरप्रमुख हर्षवर्धन कोतकर, बाबासाहेब किर्तने, चंद्रकांत खंगले, गणेश खेडकर, पिराजी वाघमारे, अंबादास गायकवाड, मंगेश खंगले, सरदार पठाण, बच्चू जाधव, जाकिर राजे, समीर सय्यद, शेख बशिर, शेख इस्माईल, बाबासाहेब दळवी, बाबासाहेब भोलार, निर्तीन अजबे, ज्योती कदम, मिनाक्षी फडतरे, गायत्री कुलकर्णी, आशा दळवी, करुणा वाघमारे, आशा चितळे, सुवर्णा डोरले, रोहिणी डोंगरे, कल्पना जाधव, रजिया शेख, सोनाली डोंगरे, आशाबाई दराडे आदिंसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी हर्षवर्धन कोतकर, संग्राम कोतकर यांची भाषणे झाली.

# काकडे वसतिगृहात मोफत प्रवेश

**समाचार/नगर-दि.१०**

जिल्हा सहकारी बँक व सहकार सभागृह समोरील आबासाहेब काकडे शैक्षणिक समुहाचे संत गाडगे महाराज छात्रालय, नगर या वसतिगृहाजवळ आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूल येथे ५ वी ते १० वी व १ ली ते ४ थी व अंगणवाडी/ बालवाडी प्रवेशाची प्रक्रिया सुरू आहे .



शाळेमध्ये मराठी माध्यम व सेमी इंग्रजी इ.५वी व इ.८वी स्कॉलरशीपच्या विद्यार्थ्यांकरीता मोफत कोचिंग क्लास ई लर्निंग व अत्याधुनिक संगणक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय टेक्निकल विभाग (इ. ९ वी व १० वी) सेमी इंग्रजी माध्यम, अनुभवी व तक्ष शिक्षक वर्ग. सर्व सोईनी युक्त प्रशस्त व भव्य इमारत. विविध खेळांसाठी भव्य क्रिडांगण. इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती व एन.एम.एम. एस. परीक्षा मार्गदर्शन, कला व क्रिडा स्पधचि आयोजन. शाळाबाह्य व सहशालेय उपक्रम (राज्यातील ऐतिहासिक क्षेत्रांना सहल व क्षेत्रभेट) राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूल मराठी माध्यम/सेमी इंग्रजी प्रवेश देणे सुरू आहे. शहरात व जिल्ह्यातील मुलांनी प्रवेश घेण्याचे आवाहन वसतिगृहाचे अधीक्षक बाबासाहेब पातकळ राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूलचे मुख्याध्यापक जगन्नाथ बोडखे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मूकबधिर विद्यालयात दिव्यांगांना मोफत प्रवेश

**समाचार/नगर-दि.१०**

अपंग संजिवनी सोसायटी संचलित मुकबधिर विद्यालय व वसतीगृह सावेडी, अहमदनगर ही संस्था सन १९८५ पासुन दिव्यांग क्षेत्रात मुकबधिर मुलांचे शिक्षण व पुनर्वसनाचे काम करत आहे. सदर विद्यालय हे आर. सी. आय. नोंदणी प्राप्त असुन (शासन मान्यता) विद्यालयामध्ये सध्या पायरी एक ते दहावीपर्यंत मुकबधिर मुलांना शिक्षण दिले जात आहे.

संस्थेने मुकबधिर (कर्णबधिर) मुलांची शिक्षण व राहण्याची मोफत व्यवस्था केली आहे. चालु शैक्षणिक वर्ष प्रवेश प्रक्रिया सुरू असून ४ ते १८ वयोगटातील मुकबधिर (कर्णबधिर) मुला/मुलींना मोफत प्रवेश देणे चालु असल्याची माहिती विद्यालयाचे अध्यक्ष मधुकर भावले यांनी दिली.

दिव्यांग मुलांना शिक्षणापासून वंचित न ठेवता त्यांना शिक्षित करून स्वतःच्या पायावर उभे करावे व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पालकांनी आपल्या मुलां मुलींचा प्रवेश घ्यावा असे आवाहन विद्यालयाच्या वतीने भावले यांनी केले.

# मुख्याध्यापकांच्या कार्यालयाचे कुलूप तोडून कागदपत्रांची चोरी

**समाचार/नगर-दि.१०**

माध्यमिक विद्यालयाच्या इसळक निंबळक शाळेतील मुख्याध्यापकांच्या कार्यालयाचे कुलूप तोडून कागदपत्र गहाळ केल्याने गुन्हा दाखल झाला आहे. तपोवन रोड द्वारका पॅलेस येथील शिक्षक नंदकुमार केशवराव तोडमल यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळाचे माध्यमिक विद्यालय इसळक निंबळक येथे सन १९९२ सालापासून शिक्षक म्हणून कार्यरत आहे. दि. ३१ मे रोजी सेवा जेष्ठते नुसार भानुदास सिताराम कोतकर हे सेवानिवृत्त झाल्याने माझ्याकडे सदर विद्यालयाचा मुख्याध्यापकाचा चार्ज होता. दि. ६ जून २०२४ रोजी रात्री ९.१५ च्या सुमारास माजी मुख्यध्यापक भानुदास सीताराम कोतकर यांनी मला फोन करून सांगितले की शाळेचा शिपाई दत्तात्रेय मुठे याचा फोन आला होता की मी शाळेच्या बाहेर ड्युटीला असताना रात्री ८.४५ च्या सुमारास निर्तीन भाऊसाहेब



कोतकर, अविनाश भाऊसाहेब कोतकर, बाबासाहेब कारभारी रहाटळ पर्यवेक्षक , संतोष भोसले एस एस फर्निचर, हे शाळेत येऊन शिपाई मुठे यांच्याकडे मुख्याध्यापक यांच्या ऑफिसची चावी मागितली असता मुठे यांनी सांगितले की मी रात्री ड्युटी करतो असे म्हणाले. वरील चारही आरोपींनी कुलूप तोडण्याच्या कटर व कुदळीने मुख्याध्यापक कार्यालयाचे विनापरवानगीने ३ कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला व थोड्या वेळाने स्वतः जवळील नवीन कुलूप लावून निघून गेले असल्याने वरील चारही आरोपींवर मुख्याध्यापक चार्ज असणारे नंदकुमार तोडमल यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## पाऊलबुधे पॉलिटेक्निकमध्ये 'दोन मुले व एक कुंडी' उपक्रम

# निसर्गाचा समतोल पर्यावरणावर अवलंबून -प्राचार्य बोर्डे

**समाचार/नगर-दि.१०**

आपल्या गरजा भागवितांना मानवाला निसर्गाचा फायदा होतो. निसर्गावर आधारित पर्यटन वाढीला पोषक वातावरण तयार करणे मानवाच्या हातात असते. प्रत्येकाला जीवन जगण्यासाठी निसर्गाची साथ आवश्यक असते. निसर्गाचा समतोल हा पर्यावरणावर अवलंबून असतो, त्यामुळे पर्यावरणाच्या रक्षणाबरोबर संवर्धन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी केले.

नारायण डोह येथील डॉ.ना.ज.पाउलबुधे पॉलिटेक्निक महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त



दोन मुले.. एक कुंडी..' उपक्रमाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, चंद्रकांत ढाकणे, राजेंद्र देशपांडे, श्रीकांत गागरे, निलेश निर्मळ, सागर बोठे, जाबीर अली, सुदर्शन लोखंडे, जयश्री होले, शशिकला देवकर, स्वाती बोरा, रेखा रोटे, सुरेखा निमसे आदि उपस्थित होते.

या उपक्रमासाठी संस्थेच्या साई पाउलबुधे यांनी २५० कुंड्या व झाडे विद्यार्थ्यांना दिले. यामध्ये दोन मुलांनी एक झाडाचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली. सर्वच विद्यार्थ्यांनी या उपक्रमास चांगला प्रतिसाद दिला.

कॉलेज परिसरात वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केले आहे. पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ही सर्वांची आहे. त्यामुळे आता २५० कुंड्यांमधील वृक्षांचे संवर्धन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर दिली, ती उत्साहाने स्विकारुन पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ते पार पाडतील असे त्यांनी सांगितले. यावेळी सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी यांनी पर्यावरणसाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. पर्यावरण दिनानिमित्त डॉ.ना.ज.पाउलबुधे पॉलिटेक्निकमध्ये सध्या प्रथम वर्षाच्या मुलांसाठी सुविधा केंद्र उपलब्ध केले असून, त्याचा लाभ विद्यार्थ्यांसह पालकांनाही होत आहे.

# विकासवर्धिनीच्यावतीने शहरात रोजगार अभियान : देशमुख

**समाचार/नगर-दि.१०**

येथील विकासवर्धिनी या संस्थेच्या वतीने नगर शहरात 'रोजगार अभियान' हाती घेण्यात आले असून त्या अंतर्गत मोफत प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले आहे., अशी माहिती विकासवर्धिनी या संस्थेचे संचालक विनायक देशमुख यांनी दिली. याबाबत अधिक माहिती देताना देशमुख म्हणाले, सध्या बेरोजगारीची मोठी समस्या असून सर्वांनाच नोकरी मिळणे शक्य होत नाही. त्यामुळे स्वयंरोजगार हा त्यावरील प्रभावी उपाय आहे. व्यवसायाचे योग्य प्रशिक्षण घेतल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकेल .

त्या दृष्टीने विकासवर्धिनी संस्थेने नगर शहरात पुढाकार घेतला असून रोजगार निर्मितीच्या उद्देशाने रोजगार अभियान हाती घेतले आहे. त्याअंतर्गत नगर शहरातील युवक, महिला व पुरुष यांना विविध व्यवसायांचे विनामूल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील ५०० लाभार्थींना हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने संगणक , शिवणकाम, एम्ब्रॉयडरी, रिसेप्शनिस्ट, सेक्युरिटी गार्ड अशा विविध विषयांचा समावेश आहे. सदर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थी स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतील किंवा नोकरी देखील मिळवू शकतील. हे सर्व प्रशिक्षण सरकारच्या विविध योजनांचा उपयोग करून दिले जाणार आहे. तसेच प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना शासकीय प्रमाणपत्र दिले जाणार आहे.असे श्री.देशमुख यांनी सांगितले.



तीन ते सहा महिन्यांचे हे प्रशिक्षण विनामूल्य असून या प्रशिक्षणात १५ ते ४५ वयोगटातील युवक, महिला व पुरुष सहभागी होऊ शकतात. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना केंद्र सरकारच्या मुद्रा योजने अंतर्गत आवश्यक ते कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रशिक्षणात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी दिनांक २५ जून २०२४ पूर्वी नांव नोंदणी करावी . अधिक माहितीसाठी विकासवर्धिनी, द्वारा - आय.एस.डी.टी., निर्मल चेंबर्स मागे, हार्मो केअर लॅब समोर, लाल टाकी अहमदनगर (मोबा-९४२२२२२६९५) , येथे संपर्क साधावा, असे आवाहन विकासवर्धिनी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



## माहेश्वरी युवा संघटनेतर्फे गायन व वादन स्पर्धा

# उपक्रमातून सामाजिक घटकांची उन्नती - धूत

**समाचार/नगर-दि.१०**

माहेश्वरी युवा संघटनेने कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. त्यामुळे त्यांची कला सर्वांसमोर येत आहे. यातूनच भविष्यात एखादा कलाकार देशपातळीवर नाव चमकवेल, असा विश्वाळस आहे. माहेश्वयरी युवा संघटना विविध उपक्रमातून समाजात मोठी जागृती करत आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकांची उन्नत्ती साधली जात आहे. अशा उपक्रमांमुळे समाज संघटन होण्यास मोठी मदत होत आहे, असे प्रतिपादन श्रीगोपाल धूत यांनी केले.

श्री महेश नवमीनिमित्त माहेश्वरी युवा संघटनेने गायन व वादन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन श्रीगोपाल धूत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी युवा संघटन अध्यक्ष शाम भुताडा, पियुष झंवर, विशाल झंवर, मधुर बिहाणी, गोविंद जाखोटिया, प्रतिक सारडा, पवन बिहाणी, पवन बंग, सुमित बिहाणी, सुमित चांडक, सिद्धार्थ झंवर, शेखर आसावा, अभिनंदन कलाणी, गोविंद दरक, संग्राम सारडा, भुषण काबरा, प्रणव बिहाणी, मुकुंद जाखोटिया आदिंसह समाजातील मान्यवर मधुसूदन सारडा, बजरंग दरक, हनुमान बिहाणी, अरुण झंवर, श्रीगोपाल जाखोटिया, अविनाश बिहाणी आदि उपस्थित होते.

प्रास्तविक अध्यक्ष शाम भुताडा यांनी केले. स्पर्धेचे प्रकल्पप्रमुख पियुष झंवर, विशाल झंवर यांनी नियोजन केले. परिक्षक म्हणून कल्पेश उदावंत, पुनम इंगळे यांनी काम पाहिले.

## प्रयास, दादा-नानी ग्रुपतर्फे सत्कार

# स्त्री शक्ती समाजात बदल घडवू शकते -राणी लंके

**समाचार/नगर-दि.१०**

स्त्री शक्ती समाजात बदल घडवू शकते. महिला सक्षमीकरणासाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. महिला जे काम हातात घेतात, ते सिद्धीस घेऊन जातात. चिकाटी वृत्तीने महिला कुटुंबाच्या प्रगतीत हातभार लावत असतात. महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी व महिला सक्षमीकरणासाठी प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपचे उपक्रम दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्या राणी लंके यांनी केले.

गुलमोहर रोड, येथील कमलाबाई नवले सभागृहात प्रयास ग्रुप व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या महिला सदस्यांचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लंके बोलत होत्या. ग्रुपच्या वतीने लंके यांचा ओटी भरुन महिलांनी सत्कार केला. यावेळी नम्रता दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जया गायकवाड, विद्या बडवे, प्रयासच्या संस्थापक अध्यक्षा अलका मुंदडा, सावेडी प्रयास ग्रुपच्या अध्यक्षा कुसुम



सिंग, उपाध्यक्ष कविता दरंदले, सचिव शकुंतला जाधव, ज्योत्स्ना कुलकर्णी, विद्या बडवे, खजिनदार मेघना मुनोत, संचालिका रजनी भंडारी, छाया राजपूत, अनिता काळे, प्रतिभा भिसे, वंदना गोसावी, सुरेखा बारस्कर, सुजाता पुजारी, सोनी पूरनाळे, अर्चना बोरुडे, लता कांबळे, स्मिता वाल्हेकर, अंबिका भिसे आदी उपस्थित होत्या.

विद्या बडवे म्हणाल्या की, यशस्वी पुरुषामागे एक महिला उभी असते. राजकीय वारसा नसताना निलेश लंके यांनी ग्रामपंचायत सदस्य ते खासदार पदापर्यंत उत्तुंग झेप घेतली. हा एक थक्क करणारा प्रवास त्यांच्या पत्नी त्यांच्या मागे सक्षमपणे उभ्या असल्याने शक्य झाले आहे कोरोना काळात लंके यांनी केलेले कार्य राज्यासाठी आदर्श ठरले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाहुण्यांचे स्वागत अलकाताई मुंदडा यांनी केले. महिलांसाठी मेघना मुनोत व अपेक्षा संकलेचा यांनी विविध मनोरंजनात्मक व बौध्दिक स्पर्धा घेतल्या. यामधील विजेत्यांना देखील बक्षीस देण्यात आली. शोभा झंवर यांनी स्वरचित कविता सादर केल्या. आभार रजनी भंडारी यांनी मानले.

# राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत नगरच्या खेळाडूंचे यश



**समाचार/नगर-दि.१०**

सुनील गोडळकर यांनी खेळाडूंना बालवयातच तलवारबाजीचे प्रशिक्षण दिल्यामुळे राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये नगर शहरातील खेळाडूंनी चांगली कामगिरी करत राष्टीय स्पर्धेसाठी निवड झाली असल्यामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडली असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

राज्यस्तरीय दहावी मिनी तलवारबाजी स्पर्धेत नगरच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी केल्याबद्दल आमदार जगताप यांच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. यावेळी प्रशिक्षक सुनील गोडळकर प्रा. संजय साठे, निलेश मदने, शैलेश गवळी, प्रा. संजय धोपावकर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त विलास दवणे, प्रा. दिनेश भालेराव, विवेक सूर्यवंशी, प्रशांत गंधे, प्रदीप पाटोळे, सचिन गायकवाड, अविनाश काळे, वैष्णवी गोडळकर, होनाजी गोडळकर, वेदिका गोडळकर विनायक भुतकर, मुकुल काशीद, शंतनू पांडव आदी उपस्थित होते.

सुनील गोडळकर म्हणाले की, नाशिक येथे राज्यस्तरीय मिनी तलवारबाजी स्पर्धा झाली. यामध्ये रिद्धी महाडिक ब्रांच, वसुधा साठे सिल्वर, निधी देशमुख ब्रांच, गार्गी देशमुख सिल्वर, प्रांजल बडगु सिल्वर, अक्षय दौंड ब्रांच पदक प्राप्त केले आहे. तसेच प्रज्वल सत्रे आणि आर्यन सत्रे यांनी टॉप ८ रँकिंग मध्ये आले असून ओडिसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी या सर्व खेळाडूंची निवड झाली आहे.

आमदार संग्राम जगताप नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम करत असतात या माध्यमातून खेळाडूंना देखील प्रेरणा व ऊर्जा मिळत असते असे ते म्हणाले.

# प्रतीक्षा भंडारी यांचा दीक्षा ग्रहण समारंभ संपन्न



**समाचार/आश्वी-दि.१०**

येथील व्यापारी नवलमल रामचंद्र भंडारी यांची नात व सुशील भंडारी व वैशाली भंडारी यांची कन्या मुमुक्षु कु. प्रतीक्षा भंडारी हिने चतुर्विध संघाच्या उपस्थित जैन भगवती दीक्षा ग्रहण केली. दीक्षा नंतर तिचे जैन साध्वी मोक्षदाजी असे नामकरण करण्यात आले.

उपाध्याय प्रवीण ऋषीजी यांच्या सानिध्यात प्रतिक्षाने जैन भागवती दीक्षा ग्रहण केली. दीक्षा महोत्सवासाठी उपाध्याय प्रवर प्रवीणऋषीजी महाराज, तीर्थेशऋषीजी महाराज, लोकेश ऋषीजी महाराज, कैवल्यरत्नाश्रीजी महाराज, चन्दन बालाजी महाराज, पदमावतीजी महाराज सन्मतीजी महाराज, सुनंदाजी महाराज, किर्तीसुधाजी महाराज, विश्वदरशनाजी महाराज, जयश्रीजी महाराज आदींसह ४० साध्वी उपस्थित होत्या. प्रतीक्षा ही साध्वींचा वेश परिधान करून मंचावर येताच उपस्थितांनी जयजयकार केला.

दीक्षापूर्वी प्रतीक्षा भंडारी मनोगत व्यक्त करतांना म्हणाली की, राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज, तसेच अनेक साधु-साध्वींच्या आशिर्वाद मला लाभले. गुरूवर्या सुनंदाजी महाराज यांनी धर्म संस्कार घडविले. माता पिता भंडारी परिवार यांनी मला संयमीव्रत धारण करण्यासाठी अनुमोदना दिली.

दीक्षा महोत्सवासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे, मा आमदार डॉ सुधीर तांबे,माजी जिल्हापरिषद अध्यक्ष शालिनीताई विखे जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष रमणलाल लुक्कड, बाबुशेठ बोरा, संजयजी मालपाणी, राजेंद्र पिपाडा,नंदुशेठ भटेवरा, ह भ प जलाल महाराज सय्यद, विखे कारखान्याचे अध्यक्ष कैलास तांबे,ॲड शाळीग्राम होडगर, भगवान राव इलग, सह. अहमदनगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातून हजारो भाविक उपस्थित होते.

यावेळी दीक्षा महोत्सवासाठी भामाशाहा रमणलाल लुक्कड, औंध पुणे यांनी सभा मंडपासाठी तर प्रकाशलाल धारीवाल, यांनी सहकार्य केले. दीक्षा महोत्सवासाठी योगदान देणाऱ्या लाभार्थींचा सत्कार दीक्षा समितीने केला.

## शहर भाजपाचा उपनगरात आनंदोत्सव
# मोदींनी हॅटट्रिक करून इतिहास रचला - गंधे



**समाचार/नगर-दि.१०**

देशाच्या पंतप्रधान पदी नरेंद्र मोदींनी तिसऱ्यांदा घेतलेली शपथ पाहून आजसर्व जनता आनंद व्यक्त करतआहे.तिसऱ्यांदा पंतप्रधान होत नरेंद्र मोदींनी नवा इतिहास रचला आहे. याचा सार्थ अभिमान भाजपच्या पदाधिकाऱ्यांना आहे.त्यांच्या पंतप्रधान कार्यकाळात देशाची वाटचाल विश्वगुरु होण्याच्या दिशेने नक्कीच होईल,असे प्रतिपादन भाजपचे विधानसभा निवडणुक प्रमुख महेंद्र गंधे यांनी केले.

देशाच्या पंतप्रधान पदासाठीनरेंद्र मोदीयांनी रविवारी सायंकाळीशपथ घेतल्यावर शहर भाजपच्या वतीने सावेडी उपनगरात पेढे वाटूनव फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जय श्रीराम,भारतमाता की जय,भारतीय जनता पक्षाचा विजय असो,पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विजय असो...आशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

यावेळीभाजपच्यासंगीता खरमाळे,गोकुळ काळे संतोष गांधी,बाबासाहेब सानप,सुमित बट्ळे, शरद बारस्कर, वेंकटेश बोमादंडी,बाळासाहेब तागड,रवींद्र काकडे,ओम काळे,राजेश हजारे,चिन्मय ख्रिस्ती, सिद्धेश नाकाडे, अभिषेक वराळे, ॲड. ऋग्वेद गंधे, लक्ष्मीकांत तिवारी, दिनेश करमरकर, कुलकर्णी उपस्थित होते.


**भाड्याने देणे आहे**

प्रेमदान चौक येथील तळमजल्यावरील सर्वसोयींनीयुक्त ४ खोल्या भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

8421306704

SAI TANK CLEANING SERVICES




9028330599
9834621600

**फ्लॅट विकणे आहे**

आनंदनगर स्टेशन रोड येथे सर्व सुखसोयींनी युक्त, रोडटच, वेलफर्निश्ड 2BHK फ्लॅट विकणे आहे.

- संपर्क -

9270063411
8446116768




टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - ८ जून ते १३ जून २०२४



| | |
|---|---|
| बॅड बॉईज | 8.40 AM<br>1.25 PM<br>8.10 PM<br>11.00 PM |
| मुंजा | 9.00 AM<br>11.00 AM<br>12.00 PM<br>3.45 PM<br>5.15 PM<br>8.30 PM<br>10.20 PM |
| मिस्टर अँण्ड मिसेस माही | 9.00 AM<br>2.30 PM<br>4.45 PM<br>10.30 PM |
| जुनं फर्निचर | 7.30 PM |
| नाच गं घुमा | 2.10 PM |
| SRIKANTH | 7.40 PM |
| बजरंग और अली | 5.00 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show CONNPLEX AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

**आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा**

व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...




SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध

V-GUARD Solar Water Heater

देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर

- अधिकृत विक्रेते -

प्रोप्रा. मिलिंद गंधे

**आदित्य एन्टरप्रायजेस्**

(*अटी लागू)

गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर. 9325103781




शुभेच्छुक :- स्वप्निल अंकम, रुपेश दुगड, सचिन दिवाणे, विक्रांत गांधी, सचिन कांबळे, ज्ञानेश्वर नेहुल, अशोक फलके, सचिन महादर, विशाल माने




**UNITED PHARMA**

Pharmaceutical Distributors

Near Kedgaon Ves, Kedgaon

90 49 93 44 44
79 72 37 80 81
98 22 02 06 49